# सुसंवाद

**एप्रिल २०२५**

**चित्पावन आठवले वार्तापत्र**



## !! शुभ वसंतोत्सव !!

**वसंतोत्सवाची सुरुवात बंगाल प्रांतात नेहमीच रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेल्या आणि संगीतबद्ध केलेल्या 'ओरे गृहोबाशी' या गाण्याने केली जाते.**





संपादक
सतीश आठवले

उपसंपादक
श्रीकांत आठवले

## मुखपृष्ठ – बंगालमधील वसंतोत्सव

# चित्पावन आठवले फौंडेशन, पुणे


## कार्यकारी मंडळ
## अनिल महादेव आठवले, अध्यक्ष
## श्रीकांत गोपाळ आठवले, उपाध्यक्ष
## सौ. यशश्री सुयोग आठवले, सचिव


खासगी वितरणासाठी

लेखांमधील मते संबंधित लेखकांची आहेत. संपादक मंडळ त्याच्याशी सहमत असेलच असे नाही.

वेबसाईट: **www.chittpavan-athavale.com**
ई-मेल: **susamvad.caf@gmail.com**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. संपादकीय | ४ |
| २. सहज सुचले म्हणून: श्री सतीश आठवले | ४ |
| ३. उद्योजकाची मानसिकता: श्री विनायक आठवले | ५ |
| ४. हिंदू मंदिरे व कायदेशीर हस्तक्षेप: श्री श्रीकांत आठवले | ८ |
| ५. वारली कला व समाज: सौ पुर्णिमा आठवले | १५ |
| ६. वर्धापन दिन – बंगळुरू | १८ |
| ७. मला समजलेले सत्य: डॉ अनघा आठवले | १८ |
| ८. सात कटुंबे व अकरा बटु: श्री हरिभाऊ आठवले | २० |
| ९. कविता - मनाचे रंग: सौ सुलभा आठवले | २२ |
| १०. वर्धापन दिन – नाशिक | २२ |
| ११. वर्धापन दिन – पुणे | २३ |
| १२. सौ शैला मुकुंद यांचा सन्मान | २३ |
| १३. वर्धापन दिन - मुंबई | २४ |
| १४. एक विशेष अभिमानास्पद घटना: श्री कुमार आठवले | २४ |
| १५. इनोव्हेशनचा परिसस्पर्श: श्री कमलेश पांडे | २५ |
| १६. तिसरे कुलसंमेलन - नाशिक: श्री श्रीनिवास आठवले | २८ |
| १६. सांस्कृतिक मंच अहवाल: श्री स्वप्नील आठवले | ३१ |
| १७. काही निवडक घडामोडी: श्री कुमार आठवले | ३२ |
| १८. पाककृती - सौ उमा आठवले | ३३ |
| १९. संस्थेतर्फे आवाहन | ३३ |

## संपादकीय

**सुसंवादचा हा दहावा अंक**.

मार्च 2022 मध्ये पहिला अंक फॉउंडेशनच्या पहिल्या वर्धापन दिनी प्रकाशित झाला त्याला आता तीन वर्षे झाली. दर तीन महिन्यांनी अंक प्रकाशित करण्याची प्रथा अजूनही चालू आहे व ती पुढेही चालू राहील जर आपल्या सर्वांचे सहकार्य मिळत राहिले तर. बऱ्याच अंकासाठी काही वेगवेगळे विषय दिले होते. प्रत्येक अंकाला लेखकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. त्या सर्व लेखकांचे आम्ही संपादक मंडळ आभारी आहोत.

हा अंक हिंदू वर्षारंभ अंक म्हणून येत आहे. गेल्याच महिन्यात आपण पुणे व इतर विभागात (नाशिक, मुंबई, बडोदा, नागाव व बंगलोर ) आपला चौथा वर्धापन दिवस साजरा केला. ह्या अंकात त्या समारंभांचे अहवाल आले आहेत. आपले तिसरे कुळसंमेलन नाशिक येथे याच वर्षी जानेवारी महिन्यात भरवले होते. सांस्कृतिक मंचतर्फे दर महिन्यात एक व्याख्यान सादर करण्यात येते. लवकरच आपण ह्या उपक्रमाचा सुवर्ण महोत्सवी 50वा कार्यक्रम सादर करीत आहोत. वैद्यकीय शिबीर, शैक्षणिक पारितोषिके व शिष्यवृत्ती असे उपक्रमाही आपण करत आहोत.

एकंदरीतच आपल्या संस्थेची वाटचाल समाधानकारकरित्या चालू आहे. ती तशीच चालू राहावी यासाठी आपले सहकार्य अपेक्षित आहे. जास्तीत जास्त मंडळींनी सभासद होणे हे संस्था व्यवस्थित चालण्यासाठी आवश्यक आहे. आपण सर्वच त्या दृष्टीने प्रयत्न कराल अशी अपेक्षा. नवीन वर्षाच्या आपण सर्वांस खूप खूप शुभेच्छा. धन्यवाद - **संपादक**

## सहज सुचले म्हणून

**श्री सतीश गजानन आठवले, पुणे**
**९८५०८ ४५७५६**

आज दुपारी घराच्या शेजारी असलेल्या खेळाच्या जागेत उन्हात शिरीष कणेकर ह्यांचे " मनमुराद " पुस्तक वाचत बसलो होतो. घरात थंड वाटतं म्हणून थोडं उन्हात बसावे असे वाटतं होते (आजकाल असे वाटू लागले आहे ). तर ते असो.

चटका जाणवयला लागला म्हणून पुस्तक मिटून उभा राहत असतांना समोरच जमिनीवर एक छोटेसे फुलपाखरू बसलेले दिसले. थोडा करडा तापकीरी त्यात भगवा व हिरवा असे रंग. छान एकदम लहान. पाहत राहिलो. उठलो तर उडून जाईल असे वाटले म्हणून बसून राहिलो. एक छान कविता ध्यानात आली. ग. ह. पाटील यांची " छान किती दिसते फुलपाखरू ". गंम्मत बघा. सिने संगीताचा व्यसंग असून सुद्धा एखादे चित्रपट गीत न आठवता, ही सुंदर कविता आठवली. प्राथमिक शाळेत केंव्हातरी वाचलेली, काळाच्या ओघात हरवलेली कविता एकदम अशी समोर आली. सुंदर, गोड, निरागस अशा शब्दांनी वर्णन करावी अशी ही कविता. त्यावेळी मनात ठसली असेल म्हणून एकाएकी लक्षात आली असं वाटत.

ह्या कवितेची कवी ग. ह. पाटील ह्या नावाचे कवी असतील हे सुद्धा बरेच दिवस माहित नव्हते. लहानपणी कोण कशाला कवीचे नाव लक्षात ठेवेल? पण काही वर्षांपूर्वी आमच्या शार्दूलला "शर आला तो धावूनी आला काळ " हे गाणे म्हणून दाखवायचो. तो लगेच झोपायचा. ही कविताही पूर्वी ऐकलेली, अभ्यासलेली. पण कवीचे नाव आठवेना. इंटरनेट वर शोधल्यावर

ग. ह. पाटील ह्यांचे नाव समजले. मुख्यत : बालगीतांसाठी प्रसिद्ध. लहान माझी बाहुली ही कविताही त्यांचीच.

विचार करता करता माझ्या हे लक्षात आले की फक्त हीच नाही तर अनेक कविता अशा आहेत ज्यांचे शब्द (किंवा चाल ) आठवतात पण कवीचे नाव (गीत असेल तर संगीतकारचे नाव ) आठवत नाही. ही गोष्ट फक्त माझीच आहे असे नाही तर अनेकांच्या बाबतीत हे घडतं. कविताच कशाला, गीत, पैंटिंग, छाया चित्रे, शिल्पकृती, कथा, कादंबऱ्या अशा सर्वच कलाकृतीनबाबत हे घडते. जगातील सातही आश्चर्ये ( किंवा जास्तच ) कोणी निर्माण केली ते माहीतच नसते. आपण फक्त निर्मिती पाहतो पण त्या मागील हात विसरतो. ही एक शोकांतिका आहे. मोनालिसा बहुतेकाना माहित असेल. चित्रकाराचे नाव किती जणांना माहित आहे. अर्थात याला अपवादाही आहेत. पण त्यामानाने नगण्य.

आजही आपण हे जग, त्यातील सुंदर असुंदर वस्तू, निसर्ग, सजीव, निरजीव वस्तू पाहतो पण त्या निर्मिणाऱ्या परमेश्वराचे आभार मनात नाही. फक्त काहीतरी आणखी मागत असतो.
मला माहित आहे यावर उपाय नाही.
एक फुलपाखरू ते काय? त्यावर एव्हढे भाष्य करण्याची गरज काय? कळतं पण वळत नाही त्याला काय करणार.

...................................................



**श्रीरंग आठवले**

## उद्योजकाची मानसिकता

**श्री  विनायक आठवले, पुणे**
**९८२२० ०२३९५**

आपण एखादा स्वतःचा उद्योग सुरु करावा असं प्रत्येक माणसाला आयुष्यात एकदातरी वाटत. बहुतेकांना  हे नुसतंच वाटत, काहीजण त्या दृष्टीने धडपड करतात पण फारच थोडे उद्योगात यशस्वी होतात.

यशस्वी उद्योजक होण्यासाठी नक्की काय लागतं ? जागा, भांडवल, जे उत्पादन करायचं आहे त्याची तांत्रिक माहिती, विक्रीकौशल्य, व्यवहारचातुर्य, व्यवस्थापन, अशा अनेक गोष्टी सांगता येतील.

पण सर्वात महत्वाचं म्हणजे उद्योगाला लागणारी विशिष्ठ प्रकारची मानसिकता. बहुतेक सर्व पालकांना वाटत आपल्या मुलाने उच्च शिक्षित व्हावं म्हणजे त्याला उत्तम नोकरी मिळेल, दरमहा नियमित पगार मिळेल आणि कोणतीही आर्थिक अनिश्चितता त्याच्या आयुष्यात डोकावणार नाही. ही अनिश्चिततेची भीतीच माणसाला उद्योग करण्यापासून परावृत्त करते. ज्यांना या भीतीवर मात करता येते ते स्वतःचा उद्योग सुरु करण्याचा विचार करू शकतात. तुम्हाला उद्योग-व्यवसाय करायचा असेल तर तुमच्या अंगी खालील गुण आहेत का हे तपासून बघा.

**विलक्षण चिकाटी** – उद्योग सुरु केला आणि लगेच भरपूर पैसे मिळायला लागले असे होत नाही . उद्योग स्थिरस्थावर होऊन प्रत्यक्ष नफा हातात यायला वेळ लागतो. तोपर्यंत निराश न होता उद्योगात टिकून राहण्याची चिकाटी हवी.

**प्रचंड श्रम करण्याची तयारी**  – नोकरीपेक्षा व्यवसायात प्रचंड श्रम करावे लागतात . मी आठ तासच काम करीन आणि उरलेला वेळ

आराम करीन ही मानसिकता चालत नाही. व्यवसाय वाढवायचा असेल तर दिवस रात्र न बघता संधी मिळेल तेव्हा ती साधायला हवी. शिवाय कोणतेही काम करण्याची तयारी हवी.

**हिशेबीपणा** – उद्योगात खर्चावर नियंत्रण ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे. आपली मिळकत आणि खर्च याचा ताळमेळ सतत घालता आला पाहिजे. नोकरीत येणारे पैसे तुमचेच असतात पण व्यवसायात येणाऱ्या पैशातून आपण काहींचे देणेही लागतो याचे भान खर्च करताना असले पाहिजे.

**बदल स्वीकारण्याची तयारी** – ग्राहकांच्या मागणीप्रमाणे व्यवसाय करण्याच्या पद्धतीत बदल करण्याची तयारी हवी. आपल्याला काय बदल करायला लागतील ते कळण्यासाठी शोधक नजर हवी आणि सतत नवीन शिकण्याची तयारी हवी. सध्या तंत्रज्ञान आणि ग्राहकांच्या अपेक्षा झपाटयाने बदलत आहेत त्यामुळे  व्यवसायात लवचिकता आणि बदल स्वीकारणे महत्वाचे झाले आहे.

**सर्वांशी मैत्री** –उद्योगात यशस्वी व्हायचे असेल "जिभेवर साखर आणि डोक्यावर बर्फ" हे तत्वज्ञान अंगिकारता आले पाहिजे. आपला मूळ स्वभाव तापट, अहंकारी, आपलं तेच खरं मानणारा असा कसाही असला तरी त्याला मुरड घालून "ग्राहको देवो भव" हे लक्षात ठेवून सर्वांशी मिळून मिसळून वागता आलं पाहिजे. प्रसंगी अपमान सहन करण्याची तयारी हवी. सर्व प्रकारच्या ग्राहकांशी संवाद साधता आला पाहिजे. "बोलाल तर माती सुद्धा खपेल, न बोलाल तर सोने पण खपणार नाही" हे वचन कायम लक्षात ठेवले पाहिजे.

**वैयक्तिक मते** – तुमची राजकीय, सामाजिक मते इतरांपेक्षा वेगळी असू शकतात. व्यवसाय करताना विरुद्ध मते असलेले ग्राहक तुम्हाला भेटले, तर या मत भिन्नतेमुळे तुमच्या उद्योगावर परिणाम होणार नाही याची काळजी घ्या. जर तुम्ही दुसऱ्या प्रांतात व्यवसाय करत असाल तर तिथल्या समाजाशी, संस्कृतीशी जुळवून घ्यायला शिका.

इंग्लिशमध्ये एक वाक्य आहे – You should put your Heart in the Business & Business in your Heart . तुमचा व्यवसाय तुम्ही मनापासून करायला पाहिजे आणि तुमच्या मनात कायम तुमच्या व्यवसायाचेच विचार पाहिजेत. उद्योगात यशस्वी होण्याची ही पहिली पायरी आहे.

## लोकसंपर्कातून मित्र कसे जोडावे

आयुष्यात मित्र जोडलेले असणे हे मोठे वैभव आहे. विशेषतः आयुष्याच्या उत्तरार्धात मित्रांची मोठी गरज भासते. त्यासाठी तरुण असतानाच लोकसंपर्क दांडगा हवा. तरुणपणी जोडलेली मैत्री म्हातारपणी टिकून राहावी यासाठी संभाषणाचे काही नियम पाळले पाहिजेत.

**अनाठायी टीका** – दुसऱ्यावर टीका करण्याची आपल्याला वाईट सवय असते. टीकेमुळे समोरची व्यक्ती कदाचित तात्पुरता बचावात्मक पवित्रा घेईल पण तुमच्या टीकेमुळे तो कायमस्वरूपी सुधारण्याची शक्यता खूप कमी आणि कायमस्वरूपी दुखावला जाण्याची शक्यता खूप जास्त असते. १०० पैकी ९९ लोक आपली चूक आहे हे मान्य करायला कधीही तयार नसतात. धिक्कार आणि टीका कुणालाच आवडत नाही. चुकीचे काम करणारी माणसे स्वतःला वगळून इतरांवर चुकीचे खापर फोडत असतात आणि दुसऱ्याच्या चांगल्या कामाचे श्रेय मात्र स्वतःला घेतात. तेव्हा टीका त्याच्यावरच करा जो तुमच्या टीकेमुळे स्वतःच्या वागण्यात सुधारणा करेल. अन्यथा कोणावरही उगाचच टीका अथवा तक्रार करू नका.

**प्रशंसा आणि कौतुक** – प्रशंसा आणि कौतुक कोणाला आवडत नाही ? लहानापासून ते मोठ्या व्यक्तीपर्यंत सर्वांना हे कौतुकच अधिक चांगले काम करायला प्रोत्साहित करते. इतरांनी केलेल्या चांगल्या कामाबद्दल खुल्या मनाने त्यांचे कौतुक करा. समोरच्या व्यक्तीने आपले काम करावे असे वाटत असेल तर त्या व्यक्तीत ते काम करण्याची इच्छा निर्माण करणे हा एकमेव मार्ग आहे आणि ही इच्छा केवळ त्याने आधीच्या केलेल्या कामाच्या प्रशंसेमुळे निर्माण होते.

**स्वारस्य –** लोकांशी बोलताना त्यांना ज्यात रुची आहे त्याबद्दलच बोला, त्यांना त्या गोष्टी मिळवण्यासाठी मार्गदर्शन करा. दुसऱ्यांनी आपल्यात स्वारस्य दाखवावे यासाठीच प्रयत्न करत राहीलात तर तुम्हाला कधीच मित्र जोडता येणार नाहीत, पण तुम्ही दुसऱ्याच्या आवडीच्या विषयात रुची दाखवलीत तर तुम्ही अनेक मित्र जोडू शकता. मित्र जोडायचे असतील तर आपण उत्साहाने त्याच्या आवडीच्या विषयावर बोलले पाहिजे, प्रसंगी त्याला मदत केली पाहिजे.

**स्मितहास्य** – रागीट किवा दुर्मुखलेल्या चेहऱ्यापेक्षा हसरा किवा आनंदी चेहेरा सकारात्मक प्रभाव निर्माण करतो. प्रत्येकाशी हसतमुखपणे बोललात तर प्रतिसादही तसाच मिळेल. आनंदी चेहेरा हा प्रथमदर्शनी दुसऱ्यावर प्रभाव पडण्याचा सोपा मार्ग आहे. एक चीनी म्हण नेहमी लक्षात ठेवा – "ज्या माणसाच्या चेहेऱ्यावर स्मित नसेल त्याने आपले दुकान कधीच उघडू नये." म्हणून नेहमी हसतमुख रहा.

**नामोच्चार** – एखादया व्यक्तीला त्याच्या नावाने हाक मारणे त्याच्यासाठी आनंददायी असते. म्हणून एकदा भेटल्यावर त्याचे नाव लक्षात ठेवायचा प्रयत्न करा म्हणजे त्यानाही आपण खूप महत्वाचे आहोत असे वाटेल . तुम्ही जितक्या व्यक्तींची नावे लक्षात ठेवू शकाल तितका प्रभावी संपर्क ठेवण्यात यशस्वी व्हाल.

**संभाषण कला** – समोरच्या व्यक्तीचे बोलणे लक्षपूर्वक ऐकणे हा त्या व्यक्तीला खुश करण्याचा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे, ते तुमच्यासाठी एक महत्वाची व्यक्ती आहेत हे त्याला जाणवेल. दुसरा माणूस बोलत असताना मधे मधे बोलणारे लोक कुणालाच आवडत नाहीत म्हणून तुम्हाला संभाषणकुशल व्हावयाचे असेल तर आधी उत्तम श्रोता बना. दुसऱ्याला त्याचे बोलणे पूर्णपणे संपवू द्या आणि मग चर्चा, वाद / प्रतिवाद करा. संभाषण करताना संयम बाळगा, रागावर नियंत्रण ठेवा, दुसऱ्यांच्या मताचा आदर बाळगा, उगीचच वादविवाद टाळा. दुसऱ्याचे बोलणे अर्धवट ऐकून स्वतःचे मत बनवणे चुकीचे आहे. संभाषण कुशल होण्यासाठी भरपूर वाचन आणि विविध विषयांचे ज्ञान असणे गरजेचे आहे.

**शत्रुत्व** – " मी तुझ्यापेक्षा अधिक हुशार आहे, तू चुकीचा विचार करत आहेस आणि तुला अक्कल माझ्यापेक्षा कमी आहे " अशी सुरुवात करण्यापेक्षा " मी चुकत असेन कदाचित पण माझा विचार थोडा वेगळा आहे, तो मी तुला समजावून सांगतो " अशी संभाषणाची सुरवात करणे केव्हाही चांगले. आपल्या बोलण्याने निर्माण झालेले शत्रुत्व बराच काळ टिकते. आणि जर चूक तुमची असेल तर लंगड्या सबबी सांगण्यापेक्षा मोकळ्या मनाने चूक मान्य करा. रागाच्या भरात तुम्ही वेडेवाकडे बोललात तर तुमचा आक्रमक सूर आणि भांडखोर वृत्ती तो कधीच विसरणार नाही. म्हणून डोक्यात कितीही राग असला, तरी मधाचा एक थेंब समोरच्याचा चढा सूर खाली आणू शकतो.

**तक्रारी आणि सकारात्मकता –** संभाषणाच्या सुरवातीलाच जर तुम्ही मतभिन्नतेचे मुद्दे

काढलेत, तर समोरून 'शक्यच नाही ' ' मला जमणार नाही ' असा प्रतिसाद येतो जो नंतर बदलणे खूप जड जाते कारण त्याचा अहंभाव आड येतो. म्हणून मतभेदाचे मुद्दे हाताळताना तुमची सुरवात सकारात्मकच झाली पाहिजे. आपलेच मत त्याने स्वीकारावे म्हणून जोरजोरात व आग्रही सुरात बोलण्यापेक्षा त्याला त्याचे मत प्रथम मांडू द्या. स्वतःला त्याच्यापेक्षा वरचढ सिद्ध करण्यापेक्षा त्याच्या तक्रारीत कितपत तथ्य आहे हे प्रथम जाणून घ्या. नंतर तुमचे वेगळे मत आवाज न चढवता शांतपणे त्याला पटवून द्या.

संभाषणातून सहकार्य निर्माण करायचे असेल तर तुम्हाला इतरांच्या भावना, इच्छा आकांक्षा, कल्पना यांना तेव्हडेच महत्व द्यावे लागेल जेवढे तुम्ही स्वतःच्या भावनांना देता.

विनायक आठवले
९८२२० ०२३९५

......................................................




**आदिवासींच्या देव-देवता**

**पूर्णिमा आठवले**

## हिंदू मंदिरे व कायदेशीर हस्तक्षेप

**श्री श्रीकांत आठवले, पुणे**
**९८२२६ ०१८०५**

**हिंदू मंदिरे व कायदेशीर हस्तक्षेप**

भारताला पुण्यभूमी म्हणतात याचे मुख्य कारण अर्थातच भारतातील असंख्य तीर्थक्षेत्रे आणि मंदिरे. तीर्थक्षेत्रे ही भारतीय संस्कृतीचा महाप्राण आहेत तर मंदिरे ही वैश्विक प्रतीके आहेत. वायू पुराणानुसार तीर्थांची संख्या साडेतीन कोटी आहे तर वराह पुराणात ती ६६ अब्ज आहे. एकूण भावार्थ असाकी भारतात तीर्थांची संख्या अनंत आहे. भारतात ६ लाख ४९ हजारांहून अधिक मंदिरे असून प्रत्येक एक लाख व्यक्तीमागे ५३ मंदिरे आहेत. त्यातील ३७% मंदिरे ही दक्षिणेकडील ५ राज्यात आहेत. मुंबई आय आय टीच्या माजी विद्यार्थ्यांनी केलेल्या सर्वेक्षणातून हे दिसून आले आहे. आता ही संख्या जर परकीय आक्रमकांच्या विविध आक्रमणानंतरची आहे तर ह्या आक्रमणापूर्वी कितीतरी जास्त मंदिरे असली पाहिजेत.

भारतात जशी हिंदूंची मंदिरे आहेत तशी इतर धर्मियांची प्राथर्नास्थळे आहेत. जसे की ख्रिस्ती लोकांचे चर्च, शिखांची गुरुद्वारे, जैन व बुद्धांची मंदिरे व स्तूप, मुस्लीम समाजाच्या मशिदी / दर्गे, इत्यादी. आक्रमणाच्या कालखंडात, इ. स. ८ व्या शतकापासून १६-१७ व्या शतकापर्यंत मोहम्मद गझनी, मोहम्मद घोरी, तुर्की, इराणी, अरब, अफगाणी अशा अनेक विकृत आक्रमकांनी धाडी घालून संपन्न भारताची धूळधाण केली. तसेच फ्रेंच, पोर्तुगीस व इंग्रज आदी परकीयांनीसुद्धा आपल्या मंदिरांवर / श्रद्धास्थानांवर घाला तर घातलाच शिवाय गुलामांची निर्यात व सक्तीच्या धर्मांतराचे

आक्रमण अतिशय निर्दयपणे केले. काही शतकातील ह्या सर्व दुर्दैवी घटनांचा कालांतराने अतिशय भीषण परिणाम हा भारतातील समाज मूल्यांवर, लोकांवर, व विचारसरणीवर झाला. त्यामुळे भारतीय लोक स्वतःला दुय्यम दर्जाचे गुलाम समजू लागले. धर्मपरिवर्तनाच्या परिणामाने परकीय धर्म त्यांना आपलासा वाटू लागला. आत्मविश्वासाला व आत्मसन्मानाला जणू कोणीतरी सुरुंग लावला होता.

त्याचा घातक परिणाम असा झाला की त्यांना सनातन हिंदू धर्माचा हळूहळू विसर पडू लागला. या पोकळीचा लाभ कम्युनिस्ट विचारप्रणालीने व प्रादेशिक राजकारण करणाऱ्या राष्ट्रविरोधी संधिसाधुनी घेतला आणि आपला पगडा बसवावयास हळूहळू पण निश्चित प्रकारे सुरुवात केली. ह्या सर्व संधीसाधूंचे एकच ध्येय होते की आपली विचारधारा पुढे न्यायची. भारत राष्ट्र म्हणून बलवान व्हावे ह्याच्याशी त्यांना काहीही देणेघेणे नव्हते.

ह्या पार्श्वभूमीवर ब्रिटिश सरकारने त्यांच्या तोडफोड नीतीप्रमाणे व स्वातंत्र्यानंतरच्या लांगुलचालन करणाऱ्या भारत सरकारने फक्त हिंदू मंदिरांवर कायदे संमत करून अनेक जाचक अटी व निर्बंध आणले. ब्रिटीशांनी भारतात धार्मिक देणगी कायदा १८६३ मधे आणला.  मद्रास हिदू धार्मिक बंदोबस्त कायदा १९२३ मध्ये आणला गेला. या कायद्याचा उद्देश काही हिंदू धार्मिक स्थळांचे चांगले प्रशासन आणि प्रशासन प्रदान करणे हा होता. राज्यघटनेनुसार तसे करण्याचा अधिकार सरकारला आहे. हा कायदा १९५० मध्ये सुधारित करण्यात आला. नंतर मद्रास हिंदू रिलिजिअस एन्डॉमेंट्स ॲक्ट १९५१ तयार करण्यात आला. तामिळनाडू सरकारचा 'हिंदू धार्मिक आणि धर्मादाय देणगी विभाग' राज्यातील मंदिर प्रशासनाचे व्यवस्थापन आणि नियंत्रण करतो. दक्षिणेकडील ५ राज्यात सर्वात जास्त मंदिरे आहेत ती तामिळनाडू मध्ये. १९५९ चा तामिळनाडू हिंदू धार्मिक आणि चॅरिटेबल एंडोमेंट्स कायदा XXII हा ३६,४२५ मंदिरे, ५६ मठ किंवा धार्मिक आदेश (आणि ४७ मठांची मंदिरे), १७२१ विशिष्ट एंडॉमेंट्स आणि १८९ ट्रस्ट नियंत्रित करतो.

ब्रिटिश वसाहतीच्या नियमांपासून ते स्वातंत्र्योत्तर कायद्यांपर्यंत हिंदू मंदिरांना सरकारी व्यवस्थापनाखालीच ठेवत आहेत. त्याचे एकच सबळ कारण आहे. **हिंदूंची मंदिरे म्हणजे पैशाची खाण आणि चर्च आणि मशिदी म्हणजे राजकारण्यांची मतपेटी बँक**. आपल्या स्वार्थासाठी वक्फ कायदासुद्धा असा युक्तिवाद करतोकी सरकारने प्रार्थनास्थळांचे नियमन करू नये कारण त्यांच्या प्राथर्नास्थळांवर सरकारचे नियंत्रण नकोच आहे. डावे-उजवे करणे कसे असते बघा, विरोधक हिंदू मंदिरांच्या नियमनावर काटेकोरपणे लक्ष केंद्रित करतात, तर इतर धार्मिक संस्था त्यांच्या बाजूने झुकते माप मिळाल्याने मोठ्या प्रमाणात स्वायत्त राहतात. साहजिकच त्या संस्थांना मोकळे रान मिळते.

भारतात धर्मनिरपेक्षतेचे मार्गदर्शन संविधानाद्वारे केले जाते. हे सर्व, धर्म समभाव किंवा सर्व धर्म समान आहेत या गांधीवादी तत्त्वावर आधारित आहे. परंतु वास्तवात मात्र सर्व जाचक अटी व कठोर नियम हे फक्त हिंदुधर्मियांनी पाळायचे अशी भावना साहजिकपणे समाजात रूढ होताना दिसते आहे. हे सर्व खूपच धोकादायक आहे.

मंदिरांमध्ये सहसा त्यांच्याशी संबंधित मंदिर ट्रस्ट असतात जे त्यांच्या दैनंदिन व्यवहारांचे नियमन करतात. १८८२ चा इंडियन ट्रस्ट

कायदा भारतातील ट्रस्ट्सचे नियमन करणारी एक निर्णायक कायदेशीर चौकट बनवते, ज्यामध्ये धार्मिक आणि धर्मादाय हेतूंसाठी समर्पित असलेल्या ट्रस्टचा समावेश आहे. यापैकी, मंदिरे एक प्रमुख स्थान धारण करतात, सार्वजनिक किंवा खाजगी असे ट्रस्टचे विस्तृतपणे वर्गीकृत केले जातात.

भारतातील हिंदू मंदिरांवर राज्य नियंत्रणाची बीजे ब्रिटिश साम्राज्याने स्वातंत्र्यपूर्व भारतात पेरली होती; आणि  स्वातंत्र्यानंतर, भारतीय सरकारांनी हिंदू मंदिरांभोवती सरकारी नियंत्रण घट्ट करण्यासाठी त्याचे अनुकरण केले. त्याचा थोडक्यात आढावा घेऊया.

**१.** भारतातील ब्रिटीश राजवटीत (१८५८ ते १९४७), भारतावर ब्रिटिश वसाहतवादी राजवटीचा प्रभाव राजकीय आणि आर्थिक पैलूंच्या पलीकडे जातो. त्यांची नीती राष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक पटलावर खोल आघात करून गेली. ब्रिटीशांच्या राजवटीत हिंदू मंदिरे आणि भारतातील पारंपारिक गुरुकुल शिक्षण पद्धतीचे पद्धतशीरपणे ऱ्हास करणे ही ब्रिटीशांनी राबवलेली एक महत्त्वाची रणनीती होती. विघटनकारी डावपेच आणि भारतीय समाजाच्या महत्त्वाच्या पैलूंवर नियंत्रण ठेवण्याच्या त्यांच्या एकत्रित प्रयत्नांमागील हीच एक प्रेरणा होती हे निश्चित. **शतकानुशतके जमा झालेली मंदिरातील संपत्ती ब्रिटिशांसाठी लक्ष्य बनली**. विविध माध्यमांद्वारे, त्यांनी हिंदू मंदिरांमधून मोठ्या प्रमाणात संपत्ती जप्त केली, ही संसाधने व निधी त्यांनी वसाहती प्रशासनासाठी वळवली आणि भारतावर त्यांचे आर्थिक नियंत्रण आणखी मजबूत केले. ह्या लुटीमुळे भारतीय समाजाचा आर्थिक पाया जाणीवपूर्वक कमकुवत केला गेला. शिवाय मंदिरे ही सामाजिक आणि धार्मिक जीवनाची केंद्रे असल्याने, जनमत ब्रिटिशांच्या बाजूने तयार करण्यात तसेच धर्मांतरासाठी मदत करण्यात त्यांचे काम महत्त्वपूर्ण ठरले. काही इतिहासकारांचा असा अंदाज आहे की भारतातील ब्रिटिश राजवटीत ३०,००० ते ६०,००० हिंदू मंदिरे नष्ट झाली. ही विनाशाची कृत्ये बऱ्याचदा भारतीय संस्कृती कमकुवत करण्याच्या आणि ब्रिटीश वसाहतवादी हितसंबंधांशी सुसंगत नसलेल्या धार्मिक प्रथा दडपण्याच्या इच्छेने प्रेरित होत्या.

**२.** इंग्रज भारतात येईपर्यंत मंदिरांचे व्यवस्थापन स्थानिक समुदाय करत होते. मंदिरे ही नृत्य आणि कलेचे केंद्र होते आणि मोठ्या विकेंद्रित व्यापार प्रणालीच्या केंद्रस्थानी होते.  प्रत्येक मंदिरात धर्मादाय देणग्या येत होत्या, ज्यामध्ये समाजाच्या फायद्यासाठी मंदिरांना दिलेल्या मालमत्तेचा समावेश होता. फायद्यांमध्ये विश्रामगृहे, गुरुकुल, पाठशाळा, गोशाळा आणि गरिबांच्या शिक्षण आणि आहाराच्या प्रगतीसाठी संस्थांचा समावेश होता. ब्रिटिशांचा वसाहतवाद आणि धर्मांतराचा अजेंडा यशस्वी होण्यासाठी मंदिर संघटना कमकुवत करावी लागली. **म्हणून, मंदिरे मुख्यतः दक्षिण भारतात सरकारी नियंत्रणाखाली आणली गेली** कारण उत्तरेकडील मंदिरांकडे इतकी मोठी मालमत्ता किंवा संपत्ती नव्हती. ब्रिटिशांनी हे करण्यासाठी १८१७ चे मद्रास रेग्युलेशन VII ॲक्ट आणले. ब्रिटीश राजवटीत राज्यकर्त्यांनी मंदिराच्या संपत्तीवर नियंत्रण ठेवण्याचा जो प्रयत्न केला तो आजपर्यंत तसाच सुरू आहे. यामुळे सरकारी हस्तक्षेप आणि अकार्यक्षमता तर झाली आहेच, पण पारंपरिक मंदिरातील पुजाऱ्यांची जुनी व्यवस्थाही हतबल झाली आहे.

**३.** ब्रिटीशांनी मद्रास रिलिजिअस अँड चॅरिटेबल एन्डॉमेंट्स ॲक्ट १९२५ लागू करेपर्यंत सर्व काही ठीक होते. **त्या  ॲक्टला मुस्लिम आणि ख्रिश्चनांकडून मोठा विरोध झाला.** त्यामुळे त्या कायद्यातून त्यांना वगळण्यासाठी तो बदलण्यात आले आणि केवळ हिंदूंना लागू केला  गेला आणि मद्रास हिंदू धार्मिक आणि

एंडोमेंट्स कायदा १९२७ असे नामकरण करण्यात आले. गंमत म्हणजे, १९२५ मध्ये शीख गुरुद्वारा कायदा संमत करण्यात आला ज्याने गुरुद्वारांना शिखांच्या निवडलेल्या मंडळाच्या नियंत्रणाखाली आणले. **त्यामुळे ब्रिटिशांकडे हिंदूंसाठी एक आणि शीख, मुस्लिम आणि ख्रिश्चनांसाठी दुसरे कायदे होते.** आजही, हिंदू शैक्षणिक संस्था, मंदिरे, धार्मिक परंपरा सरकारी नियंत्रण आणि न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधीन आहेत, सबरीमाला मंदिरावरील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उदाहरण हेच सांगते. परंतु १९३५ च्या XII कायद्याद्वारे १९२७ च्या कायद्यात आमूलाग्र बदल करण्यात आला, ज्याद्वारे मंदिरे सरकारद्वारे अधिसूचित केली जाऊ शकतात आणि त्यांचे प्रशासन ताब्यात घेतले जाऊ शकते. अशा प्रकारे हिंदू धार्मिक बंदोबस्त मंडळाने मंदिरे ताब्यात घेण्याचे आणि प्रशासनाचे अधिकार स्वीकारले. मंडळात तीन ते पाच सदस्य होते.

**४.** स्वातंत्र्यानंतर, तामिळनाडू सरकारने १९५१ मध्ये हिंदू धार्मिक आणि चॅरिटेबल एन्डॉमेंट्स ॲक्ट, १९५१ नावाच्या कायद्याद्वारे मंदिरे आणि त्यांच्या निधीचा ताबा घेतला. या कायद्याच्या तरतुदींना मद्रास उच्च न्यायालयात आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले ते शिरूर मठ प्रकरणात. **१९५१ च्या कायद्यातील अनेक तरतुदी दोन्ही न्यायालयांनी रद्दबातल ठरवल्या**. काही बदलांसह, १९५९ मध्ये तामिळनाडू हिंदू धार्मिक आणि चॅरिटेबल एंडोमेंट्स कायदा मंजूर करण्यात आला. तेव्हा देशात काँग्रेसची सत्ता होती. धार्मिक ट्रस्ट आणि संस्थांचे व्यवस्थापन योग्य प्रकारे करणे आणि उत्पन्नाचा गैरवापर होणार नाही याची खात्री करणे हा या कायद्याचा उद्देश (?) असल्याचे त्यात म्हटले आहे. कोणत्याही हिंदू पब्लिक चॅरिटेबल एंडोमेंटचे गैरव्यवस्थापन होत आहे असे सरकारला वाटत असेल, तर ते आयुक्तांना चौकशी करून एंडोमेंट सरकारी नियंत्रणाखाली आणण्याचे निर्देश देऊ शकते. **गैरव्यवस्थापनाची ही तरतूद मुस्लिम आणि ख्रिश्चन समुदायांना लागू होत नाही.**

**५.** मग, आज राज्य सरकारे हिंदू मंदिरांचे व्यवस्थापन कसे करतात? उदाहरण म्हणून आपण श्री अरुलमिगु धनदायुथापानी स्वामी मंदिर, पलानी, तामिळनाडू घेऊ. हुंडीचे सर्व संकलन मंदिराच्या नियुक्त खात्यात जमा केले जाते. यातील १४ टक्के प्रशासन शुल्क, ४ टक्के लेखापरीक्षण शुल्क (कलम ९२), २५-४० टक्के पगार आणि १-२ टक्के नमाज व इतर उत्सव खर्चासाठी. एकूण संकलनापैकी 4-10 टक्के रक्कम 'कमिशनर कॉमन गुड फंड' (कलम 97) मध्ये जाते. शिवाय, मोफत जेवण आणि विवाह यांसारख्या सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या विविध लोकप्रिय योजनांमध्ये पैसे हस्तांतरित केले जातात. अशाप्रकारे, मंदिराच्या उत्पन्नातील 65-70 टक्के रक्कम मंदिराशी संबंध नसलेल्या किंवा केवळ प्रशासकीय कामांसाठी वापरली जाते. लक्षात घ्या की प्रार्थना करणाऱ्या अर्चकांना तुटपुंजे वेतन दिले जाते आणि काही वेळा काहीच नसते. मंदिरे जी प्राचीन काळी समाजभिमुख कामे करायची जशी विद्येची केंद्रे व वेद पाठशाळा चालवणे आणि सनातन धर्माविषयीचे ज्ञानाचा प्रसार करणे यासाठी फारसा निधी वापरत नाहीत कारण तो उपलब्धच नसतो. म्हणजे, भारतीय तत्त्वज्ञान आणि परंपरा शिकवण्यासाठी वेद पाठशाळा आणि शैक्षणिक संस्था उभारण्यासाठी मंदिर निधीचा वापर केलाच जात नाही

**६.** बँक खाते देवतेच्या किंवा देवस्थानच्या नावावर असते. ही मंदिरे राज्य कायद्यांतर्गत स्थापन करण्यात आली असल्याने, त्यांचे उत्पन्न आयकर कायद्याच्या कलम 10 (23BBA) अंतर्गत आयकरातून मुक्त आहे. म्हणून, जर

मंदिराचे उत्पन्न एकतर सरकारने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी खर्च (कमीत कमी उत्पन्नाच्या ८५%) केले नाही किंवा अतिरिक्त पैसे मुदत ठेवींमध्ये ठेवले तर हुंडी देणग्यांवर कर आकारला जातो. अशा प्रकारे हिंदू मंदिरे हे सरकारी तिजोरीत योगदान देण्याचे एक मोठे साधन बनले आहे. म्हणजेच ब्रिटिश सरकारची रणनीती आपण आजही गुण्यागोविंदाने पुढे चालू ठेवली आहे. **अर्थातच त्यामुळे मंदिरे ही समाजाभिमुख न होता सरकारभिमुख झाली आहेत**. हे समाजा करिता व अर्थातच राष्ट्रकारिता हानिकारक आहे.

**७.** अशा रीतीने, सरकार हे केवळ हिंदू मंदिरांसाठीच 'योग्य' प्रशासन आणि त्याचे उत्पन्न 'योग्य' हेतूंसाठी वेगवेगळ्या सरकारी योजनांमध्ये वापरण्याची खात्री करू इच्छिते. ह्या 'योग्य' हेतूंमध्ये हे धन इतर धर्माच्या कामासाठी वापरले जात असले पाहिजे हे सांगावयास कोणा ज्योतिषाची गरज नाही. हे पण लक्षात घेतले पाहिजेकी इतर धर्मस्थानचे उत्पन्न फक्त त्यांच्या उपयोगासाठी वापरले जाते. **म्हणजे 'माझे ते माझे व तुझे तेपण माझे**'. काय अजब न्याय आहे बघा आणि ह्याला वाचा फ़ोडलीच पाहिजे. **श्री सुब्रमण्यम स्वामी** यांनी लिहुन ठेवले आहे की, "श्रीरंगम रंगनाथ मंदिराने सरकारला रु. १८ कोटी २०१०-११ मध्ये 'मंदिराचा कारभार' करण्यासाठी, देवतांच्या मिरवणुकीत वेद व इतर स्तोत्रे यांचे पठण करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी दिले होते पण कर्मचाऱ्यांना त्यासाठी कोणतेही वेतन दिले नाही. त्यांना भक्तांकडून प्रसाद मिळतो आणि अर्चना तिकिटांच्या विक्रीत वाटा असतो तो तेवढाच !

**८.** मंदिराची संपत्ती ही आता वस्तुतः छद्म-सरकारी मालमत्ता बनली आहे. त्यानुसार **श्री टी.आर. रमेश**, अध्यक्ष, मंदिर उपासक सोसायटी चेन्नई यांने सांगितले आहे की - "१९८५ ते २००५ दरम्यान तामिळनाडूच्या मंदिरांनी 'फक्त' ४७,००० एकर जमीन ' गमावली' आणि **सध्या तामिळनाडूमधील हिंदू मंदिरांच्या १० दशलक्ष चौरस फुटांपेक्षा जास्त मौल्यवान जागा अतिक्रमणाखाली आहेत**." ते पुढे म्हणतात, "तामिळनाडूमध्ये मंदिरांकडे ४७८,००० पेक्षा जास्त एकर जमीन, २.४४ कोटी चौरस फूट मालमत्ता आहे ज्यासाठी ' हिंदू धार्मिक आणि धर्मादाय देणगी विभागाला' केवळ ५८ कोटी रुपये मिळतात. प्रत्यक्षात सर्व मंदिरांचे उत्पन्न, मठ, पुराणमतवादी आधारावर ६,००० कोटी रुपये आहे ! **म्हणजे मंदिर निधीतील किती मोठा वाटा वैध पद्धतीने बाहेर काढला जातो व अवैध कामांसाठी वापरला जातो हे लक्षात येते.**

**९.** भारताच्या वैभवशाली वारशाचा भाग असलेल्या प्राचीन मंदिरांतील मूर्ती गायब झाल्या आहेत. कोणत्याही सुव्यवस्थित संस्थेत, जबाबदार व्यक्तींना जबाबदार धरले जाईल आणि त्यांना शिक्षा होईल, परंतु सरकारमध्ये नाही. त्या मूर्तींची विक्री अवैध पद्धतीने परदेशात नक्कीच होत असली पाहिजे. मग ते पैसे कोण घेतो व कशासाठी वापरतो? तसेच सरकारी हस्तक्षेपामुळे पौरोहित्याच्या प्राचीन वंशामध्ये व्यत्यय आला आहे. **अशा प्रकारे जेव्हा सरकार कोणत्याही संस्थेवर नियंत्रण ठेवते तेव्हा राजकीय हस्तक्षेप, राजकीय आश्रय आणि भ्रष्टाचार हा नक्कीच डोकावतो नव्हे फोफावतो**.

**१०.** आपण आता आपण केरळ पाहू. अयप्पा धर्म सेनेचे अध्यक्ष राहुल इसवार यांच्या मते, "केरळमध्ये गुरुवायूर, मलबार, त्रावणकोर आणि कोचीन अशी चार देवस्वोम मंडळे आहेत. प्रत्येक मंडळात सरकारद्वारे नियुक्त केलेले नामनिर्देशित आहेत. जेव्हा कम्युनिस्ट सत्तेत असतात तेव्हा ते त्यांच्या स्वतःच्या पक्षांचे सदस्य आणि युतीच्या भागीदारातून एक सदस्य नियुक्त करतात. काँग्रेस सत्तेवर आल्यावर ते

नायर, एझावास आणि मतपेढीवर आधारित तिसरा समुदाय यांच्यात समतोल साधतात." **त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या, मंदिरांच्या व्यवस्थापनावर सरकारचे काहीही म्हणणे नाही, परंतु प्रत्यक्षात ते त्यांच्या नामनिर्देशित राजकीय व्यक्तींद्वारे मंदिरांवर नियंत्रण ठेवतात**. ते पुढे म्हणतात की, "हुंडीचा संग्रह सनातन धर्माच्या प्रचारासाठी किंवा गरीब हिंदूंच्या फायद्यासाठी किंवा रुग्णालये आणि अनाथाश्रम उघडण्यासाठी खर्च केला जात नाही. त्याऐवजी, ज्याला अनाकलनीयपणे 'विकास आणि बांधकाम' म्हणतात त्यावर पैसा खर्च केला जातो.

**११.** स्वातंत्र्यापूर्वीचे आखलेले ब्रिटिशांचे धोरण हे स्वातंत्र्यानंतरही कायम आहे. **हिंदू इतके अक्षम आणि भ्रष्ट आहेत का की त्यांना स्वतःची मंदिरे सांभाळता येत नाहीत?** ह्यावर गांभीर्याने विचार मंथन व्हायलाच हवे.

**१२.** अनेकांना धक्का बसेल की भारत हा जगातील एकमेव असा देश आहे जिथे बहुसंख्य समुदाय, जे लोकसंख्येच्या जवळपास ८० टक्के आहेत, तो धार्मिक भेदभावाच्या राज्य-प्रायोजित धोरणाच्या अधीन आहे. या भेदभावपूर्ण उपचारासाठी निवडलेले साधन हे धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व आहे, हे त्याहूनही अविश्वसनीय वाटू शकते, धर्मनिरक्षेपता ही संज्ञा, त्याच्या मूळ संकल्पनेत, राज्य आणि धर्माचे वेगळेपण दर्शवते! **या भेदभावपूर्ण प्रथेची मुळे भारताच्या वसाहतवादी इतिहासात २०० वर्षांहून अधिक काळ गेली असली, तरी खरी विडंबना ही आहे की भारताच्या वसाहतवादी राजवटीपासून सुमारे आठ दशकांच्या स्वातंत्र्यानंतरही ती कायम आहे**.

विश्व हिंदू परिषदेने (व्हीएचपी) मंगळवार दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी मंदिरांना सरकारच्या नियंत्रणातून मुक्त करण्यासाठी मोहीम सुरू केली आणि दावा केला की सरकारी नियंत्रण "मुस्लिम आक्रमणकर्ते" आणि "वसाहतवादी ब्रिटिश" यांच्या मानसिकतेचे प्रतिनिधित्व करते. तिरुपती बालाजी मंदिराच्या प्रसादामध्ये भेसळीच्या आरोपांच्या मोठ्या वादाच्या पार्श्वभूमीवर या मोहिमेची सुरूवात झाली आहे.

विहिंपचे संयुक्त सरचिटणीस **श्री सुरेंद्र जैन** म्हणाले, "सरकार आपली संपत्ती लुटण्यासाठी आणि सरकारमध्ये स्थान मिळवू न शकलेल्या राजकारण्यांना सामावून 'त्यांची सोय' करण्यासाठी मंदिरांचा वापर करत आहेत. व्हीएचपीच्या कार्यकर्त्याने सांगितले की प्राण्यांच्या चरबीसह प्रसादममधील कथित भेसळीमुळे "संपूर्ण हिंदू समाज संतप्त झाला" आणि असा दावा केला की केरळच्या सबरीमालासारख्या इतर मंदिरांमधूनही अशा भेसळीच्या बातम्या येत आहेत. सुरेंद्र जैन म्हणाले की, हा हिंदू समाजाच्या भावनांशी केलेली गुन्हेगारी कट आहे." **या सर्व घटनांमधील समान दुवा म्हणजे ही सर्व मंदिरे सरकारच्या नियंत्रणाखाली आहेत**.

"मंदिरांना सरकारच्या नियंत्रणातून मुक्त करणे आणि त्यांना समाजाच्या स्वाधीन करणे हा या समस्येवर एकमेव स्थिर उपाय आहे. समाज हा त्यांच्या संतांच्या मार्गदर्शनाखाली मंदिरे व्यवस्थापित करेल", असे सुरेंद्र जैन म्हणाले. ही लूट आता संपली पाहिजे. आमचा नारा आहे: **"हिंदू कारणासाठी हिंदू पैसा**". जैन पुढे म्हणाले की एकट्या तामिळनाडू सरकारच्या नियंत्रणाखाली 400 हून अधिक मंदिरे आहेत आणि त्यांनी आरोप केला की **"गेल्या १० वर्षांत, या मंदिरांमध्ये राज्याने ५०,००० कोटी रुपयांचे नुकसान केले आहे."** मोहिमेची "पहिली पायरी म्हणून" सर्व राज्यांच्या राजधानींमध्ये विहिप निषेध रॅली

काढेल आणि मुख्यमंत्र्यांना मागण्यांचे निवेदन देईल. “आवश्यक असल्यास, कायदेशीर पावले देखील त्यानंतर उचलली जातील. आणि जर हे पुरेसे नसेल तर आम्ही भविष्यात आंदोलन देखील करू शकतो,” ते पुढे म्हणाले.

या भेदभावपूर्ण प्रथेची मुळे भारताच्या वसाहतवादी ब्रिटिश इतिहासात 200 वर्षांहून अधिक काळ गेली असली, तरी खरी विडंबना ही आहे की भारताच्या वसाहतवादी राजवटीपासून सुमारे आठ दशकांच्या स्वातंत्र्यानंतरही ती कायम आहे.

"हिंदु राष्ट्रातील हिंदू" या त्यांच्या लेखात **श्री आनंद रंगनाथन** यांनी भारतातील धर्मनिरपेक्ष लूट आणि हिंदू मंदिरांच्या लूटमारीला मान्यता देण्याच्या भारतीय राज्याच्या हेतूंवर योग्य भाष्य केले: **हिंदू मंदिरे आणि त्यांच्या मालमत्तेवर राज्याचे नियंत्रण हा स्वतंत्र भारतातील सर्वात मोठा, आर्थिकदृष्ट्या सर्वात हानीकारक घोटाळा आहे**. हे केवळ चालूच नाही तर सध्याच्या सरकारच्या काळातही भरभराट होत आहे, हे आपल्या देशातील राजकारणी हिंदूंना कसे वागवतात याचे दुःखद प्रतिबिंब आहे.  हिंदू मंदिरांच्या लूट आणि लुटण्याच्या तुलनेत धनप्राप्तीसाठी पेट्रोलियम क्षेत्राचा वापर सुद्धा फिका पडतो.

धर्मनिरपेक्षतेच्या ध्वजवाहकांच्या आकलनाच्या मर्यादेपलीकडे हे कसे आणि का आहे हे मला माहित नाही की जर तुमचा खरोखर विश्वास असेल की धर्म राज्याबाहेर ठेवला पाहिजे, तर त्या नाण्याची दुसरी बाजू म्हणजे - राज्याला धर्मापासून दूर ठेवले पाहिजे. ...आपले राज्य स्वतःला धर्मनिरपेक्ष असल्याचे घोषित करते परंतु निर्लज्जपणे तसे करत नाही, जसे ते हिंदू प्रार्थनास्थळांचे नियमन, शासन आणि नियंत्रण करतात.

ह्या पार्श्वभूमीवर, हिंदू मंदिरावरील सरकारी (राजकीय) नियंत्रण दूर होणे हाच खरा 'सर्वधर्मसमान' भाव आहे.

श्रीकांत आठवले
९८२२६ ०१८०५

**सारांश**

भारताला पुण्यभूमी म्हणतात याचे मुख्य कारण अर्थातच भारतातील असंख्य तीर्थक्षेत्रे आणि मंदिरे. ब्रिटिश सरकारने त्यांच्या तोडफोड नीतीप्रमाणे व स्वातंत्र्यानंतरच्या लांगुलचालन करणाऱ्या भारत सरकारने फक्त हिंदू मंदिरांवर कायदे संमत करून अनेक जाचक अटी व निर्बंध आणले.  त्याचे एकच सबळ कारण आहे - हिंदूंची मंदिरे म्हणजे पैशाची खाण आणि चर्च आणि मशिदी म्हणजे राजकारण्यांची मतपेटी बँक. ब्रिटिशांकडे हिंदूंसाठी एक आणि शीख, मुस्लिम आणि ख्रिश्चनांसाठी दुसरे कायदे होते. त्यामुळे मंदिरे ही समाजाभिमुख न होता सरकारभिमुख झाली आहेत.  ह्या पार्श्वभूमीवर, हिंदू मंदिरावरील सरकारी (राजकीय) नियंत्रण दूर होणे हाच खरा 'सर्वधर्म समभाव' आहे.

.....................................................

**तळटीप:** हा लेख या आधी आदित्य प्रतिष्ठानच्या 'आदित्य दीप'  मध्ये प्रकाशित झालेला आहे

## वारली समाज व कला

**सौ पुर्णिमा शरदचंद्र आठवले, नाशिक**
**९६२३५ ७३४७५**

**लोककला** कलेच्या, विश्वात डोकावताना संपूर्ण भारतदेश डोळ्यासमोर उभा रहातो, कारण भारत हा एक कलात्मक देश आहे. प्रत्येक राज्यांत अतिशय सौदर्यपूर्ण चित्रप्रकार, चित्रशैली आजही जतन केलेल्या दिसतात. मिथिला शैठी, कलमकारी, ओडिसी , पट्टचित्रे, फाड चित्र, गोंड शैली, अजंता शैली, मधुबनी आणि वारली चित्रशैली अशा अनेक लोककला- अती प्राचिन काळापासून अती सामान्य ते असामान्य कलाकार- हे गुरुशिष्य परंपरेने त्या जीवंत ठेवतांना दिसतात. कमी जास्त प्रमाणात त्यांचे पुनुरुज्जीवनही करतांना दिसतात.
या सर्व लोककला या चित्र व शिल्प कलेच्या आत्मा आहेत. प्रत्येक शैलीच्या निरीक्षणाअंती असे दिसते की अतिशय निरागसतेने, सहज, सोप्यारितीने त्यातील घटकांचे चित्रण व रंगलेपन केले आहे. तसेच त्या चित्रांना आकर्षक करण्यासाठी चित्रात नक्षी अलंकार व निसर्गाचे सुंदर नक्षीदार चित्रण याचा आवर्जून अंतर्भाव केलेला दिसतो.

**चित्रशैली** ज्या काळात हि चित्रे या शैली उदयाला आल्या त्या वेळेच्या कलाकारांना ती शैली कोणी शिकवली नव्हती. परंपरागत, अनेकजणांनी आपल्या निरिक्षणांनी व अनुभवाने त्या विकसीत केल्या व त्यांचा प्रसार केला.
आपापल्या झोपड्या, घराच्या भिंती, अंगण, ओटे यावर नैसर्गिक रंगांचा वापर करून केवळ सौंदर्यनिर्मिती या उद्दात्त हेतूनेच ही चित्र काढून गावा पाड्यांचे सुशोभिकरण केलेले दिसते. इतर मनोरंजनाची साधने नव्हती पण आपला वेळ चांगल्या कामासाठी कलेसाठी व्यतीत करून पूर्वज कलाकारांनी आपल्यासाठी अनमोल चित्रठेवा दिला आहे.

**आदिवासी पाडा** पाच पंचवीस झोपड्यांचा समुह म्हणजे पाडा -डोंगर माथ्यावर - सांदीत, जंगलत - अगदी दुर्गम भागातही शेती व्यवसाय करीत आदिवासी आपले जीवन शांतपणे जगताना दिसतो. सहयाद्रीच्या कुशीत - निसर्ग सानिध्यात वसलेले पाडे सुबक, दुमदार दिसतात, पाण्याची टंचाई असूनही १०/१० मैलावरुन पाणी आणताना स्त्रियांचे चेहरे हसरे असतात. आमचा नाशिक जिल्हा तर आदिवासी बहुल आहे त्रंबकेश्वर- देवरगाव- वाघेरे- हरसूल- ठाणेपाडा ते अगदी गुजरात बॉर्डर पर्यंत तसेच जव्हार - पालघर- सुरगाणा -गुही पर्यंत आदीवासी वस्ती दिसते.

**वारली चित्रे** आदीवासींमध्ये अनेक उपजाती आहेत - कोकणा-कोळी, अग्री, ठाकर - कातकरी - गोंड, यातले, कातकरी हे 'वारली चित्र काढणारे आहेत. वारल म्हणजे शेत- शेती करता करता चित्र काढणारे म्हणून वारली चित्रकार त्यांनी काढलेळी चित्रे म्हणजे 'वारली चित्रे.
कुडाच्या भिंती, नारळाच्या झावळ्या वाळलेल्या गवताच्या पेंढ्या अथवा बांबूच्या तंट्यानी शाकारलेल्या झोपड्या - भिंती, लाल किंवा पांढऱ्या मातीने सारवलेल्या झोपडीचा भवताल शेण मातीने चिकण चोपडा केलेला –भिंती, ओटे , अंगण , गेरूने लाल चॉकलेटी रंगात सारवून त्यावर पांढऱ्या रंगाने म्हणजे चुन्याने पारंपरिक पद्धतीने - फुले पाने , पशु पक्षी, झाडे , झोपड्या स्त्री पुरुषांच्या आकृत्यांनी सुशोभित केलेले पाडे सुंदर दिसत .
त्यांच्या झोपड्यावर चितारलेले मोर फळझाडे फुलझाडे, नृत्यचक्र-वादक म्हणजे सजावटीचा

आदर्श नमुनाच-चित्र काढतांना मुक्त मनाने- लहान थोर - सर्वजण चित्र काढण्याचा आनंद घेतात. या चित्रकारांना, ना कोणी चित्रकलेचे शिक्षण दिले न प्रशिक्षण ना कोणाचे मार्गदर्शन पण 'वारली' शैठीचे वैशिष्य म्हणजे बारकावे, अलंकरण व निरीक्षणातून सुंदर - आकर्षक चित्रांचा उदय झाला.



**चित्र पद्धत** पूर्वी बांबूच्या कामटीला चिंधी गुंडाळून ब्रश तयार करीत "तांदुळाची पिठी ओली करून - पातळ करून त्याने चित्र काढत. गेरूच्या लाल चॉकलेटी रंगावर पांढ-या तांदूळ पिठीने काढलेकी चित्र उठुन दिसत- आता मात्र तांदूळपिठी न वापरता चुना नाहीतर पांढरा पोस्टर कलर ऑईल कलर वापरतात.

**चित्र विषय** त्यांचे चित्र विषय म्हणजे, त्यांचे सण-समारंभ-बैलपोळा- नागपंचमी - दिवाळी पण मोठा सण म्हणजे होळी पौर्णिमा; परंपरा व चालीरीती दाखवितीना लग्नसमारंभ मिवणूक – जत्रा -यात्रा यांचे अचूक चित्रण- निसर्ग - पंचमहाभूते या बरोबर

**देवदेवता** त्यांचे देव देवता. म्हणजे धरणीमाता, सूर्यचंद्र, कणसरी माता, डोंगरदेव –दगुडदेव- नागदेव- वाघदेव यामागे त्यांची अंधश्रद्धा नसून निसर्गातील पंचमहाभूते या बद्दलची श्रद्धा व आदरभाव दिसून येतो.
समारंभ- पूजा- लग्नकार्याच्या वेळी दारावर व भिंतीवर चौक काढतात व शुभ चि काढतात.

त्यांच्या प्रत्येक चित्राला अर्थ असतो. 'ती चित्रे सहज सोपी असल्याने समजायला सुकर असतात त्यामुळे ती सर्वांना आवडतात.

**एक्सरे चित्र** 'वारली' चित्रात-एक्सरे चित्र काढण्याची त्यांची पद्धत मोठी निरागस वाटते, जसे माठातील पाणी-ढगातले पाणी दाखविणे, झाडाची जमिनीखालची मुळे दाखविणे- मासे दाखवितांना आतली हाडे काटे दाखविणे हि पद्धत असते.

**यथार्थ दर्शन** आदीवासी लोक वारली चित्रात यथार्थ दर्शनाचा (परस्पेक्टीव्ह) विचार करीत नाहीत. झोपडीच्या मागचे दृष्य ते झोपडीच्या वर दाखवितात. नृत्याचे गोलकार चित्रण- त्यातील आकृती- टोपली- ताट- विहीर- कुंपण यांचे चित्रण पक्षी नेत्र (बर्डस आय) पध्दतीने काढलेले असते. (जशी प्लॅनची अकृती असते).

**किनार नक्षी** त्यांच्या चित्रांचं अजून एक वैशिष्य म्हणजे ते प्रत्येक चित्राला किनारनक्षी काढतात (जणू फ्रेमची बॉर्डर) माझ्या 'चित्रभाषा' पुस्तकात २२ प्रकारच्या बार्डर मी खास अभ्यास करून काढल्या आहेत. त्यांच्या चित्रातील प्रतिमा (सिम्बॉल) दाखवून त्याचा अर्थही लिहिला आहे.



**आदिवासी नृत्य** "सणावारी - लग्नसमारंभात विषेशतः होळी या मोठ्या सणाला - आनंदा प्रित्यर्थ समुहनृत्य करतात. पारंपारिक पोषाखात- स्त्री -पुरुष फुलाफळांचे- शेंगा- पानांचे- भाज्यांचे हार तुरे घालुन समूहनृत्य करतात. स्त्रिया केसात फुलेपाने तुरे खोवून एक सारख्या पदन्यासात उंच , किनऱ्या आवाजात गाणी म्हणतात. तारपा-ढोल, सनई अशा पारंपारिक वाद्यांच्या तालावर-नृत्य करतात. पुरुष पायात घुंगरे घालून - व घुंगुर काठी घेवून होळी भोवती गोलाकार - वर्तुळाकार फेर धरून नाचतात, त्यांच्या 'वारली' चित्रात नृत्याचे चक्राकार अथवा चकली प्रमाणे गोलात गोल, स्त्री पुरुष एकत्र नृत्य असते ते तांच्या चित्रांचे खास वैशिष्ठय आहे.

**आनंदी आदिवासी** आदीवासी प्रदुषण मुक्त अशा निसर्गसानिध्यात रहातो, त्यामुळे निसर्गाला सांभाळून – निसर्गालाच देव मानून पुजतांना दिसतो. साधे सरळ- गरजशुन्य जीवन- घरापुरते धान्य पिकवतो, जास्तीचा हव्यास नाही. आहे त्यात आनंद समाधान मानतांना दिसतो. त्यामुळे चितामुक्त रहातो. हातात रोख रक्कम कमी पण दोन वेळेचं पोटभर जेवण त्यात फारसं नाविन्य नाही. त्यामुळे आरोग्य उत्तम - भरपूर कष्ट- ताजे अन्न व समाधानी वृती त्यामुळे आनंदी व सुदृढ असतात.

कोविड काळात आमचे आदीवासी, लोक कोणीही आजारी पडले नाही त्यांची दैनंदीन कामे सुरळीत चालु होती.

ज्यांच्याजवळ शेती नाही ते उस तोडणी –द्राक्षे खुडणी, टोमॅटो कांदे खुडणीसाठी जातात – शेतात मजूरीने काम करतात - काहीजण ड्रायविंग शिकून पाड्यांना जोडणाऱ्या रस्त्यावर टॅम्पोट्रॅक्स चालवून निर्वाह करतात.

**जीवन शैली** ४थी ८वी फारतर १०वी १२ वी नंतर शिक्षण सोडण्याचं प्रमाण जास्ती आहे - कारण शेती- शिवारात कामाला मनुष्यबळ लागतं - मुलं शिकली की कामाला नकार देतात -पोषाखी होतात- गाईगुरांचं करायला – मातीशेणात हात घालायला नाही म्हणतात. बाहेरचे मजूर बोलवणे परवडत नाही म्हणून शिकणाचं महत्व कमी आहे - जे काही शिकतात त्याचा शेतीसाठी उपयोग नाही.

**समृद्ध लोककला** या सर्व जीवन चक्रातून फिरतांना त्यांच्या उपजत कलेकडे- समृद्ध लोककला 'वारली' चित्रकले कडे आदीवासींचे दुर्लक्ष झालेले दिसते पूर्वी कोणत्याही पाड्यावर जा. घराच्या भिंती, खांब ओटे, अंगणपरिसर, सगळ्या ठिकाणी गेरूने लाल चॉकलेटी रंगाने सारवलेले व त्यावर शुभ्र चुन्याने चितारलेली मुक्त 'वारली' चित्रे दिसत. आता त्याचे प्रमाण नाहीच्या बरोबर झालेले आहे. काही तुरळक ठिकाणी हि कला दिसते. आणि म्हणूनच या कलेचे पुनुर्ज्जीवन व्हावं – नव्या पिढीने पुन्हा ही पूर्वजांनी दिलेली समृद्ध ठेव जतन करावी व जीवंत ठेवावी ही तिव्र इच्छा आहे. याच तळमळीने मी ३०/३२ वर्षे विनामुल्य ही कला शिकवून विद्यार्थी तयार करीत आहे.

**माझी तळमळ** आता ग्रामिण भागात माझ्या आईला श्रद्धांजली म्हणून तिचा नावाने 'सुंदरबन चित्रपाडा' करून तेथे आदीवासी विद्यार्थ्यांना विनामुल्य वारली शिक्षण देत आहे तेथे माझी वारली चित्रे प्रदर्शन स्वरुपात लावली आहेत- जांना ही आर्ट शिकायची आहे अशा कोणत्याही वयाच्या स्त्री पुरुष, विद्यार्थ्यांनी येवून शिका व हि कला जिवंत ठेवा ही सदीच्छा आहे. आपल्या सुंदरतेने - निरागसतेने पुन्हा ही कला नटावी व घरे, गाव आणि आपला महाराष्ट्र पुन्हा कलासक्त व्हावा असे तळमळीने वाटते म्हणूनच माझे प्रयत्न चालू आहेत.

सौ पुर्णिमा शरदचंद्र आठवले

..................................................

## फौंडेशनचा वर्धापन दिन - बंगलुरू

बंगलुरू येथे २३ मार्च २०२५ रोजी आपल्या फौंडेशनचा वर्धापन दिन साजरा झाला. मुख्य कार्यक्रम भजनाचा होता. भजना नंतर संस्थेचे अध्यक्ष श्री अनिल आणि श्री गोपाळ विठ्ठलपंत यांनी पसायदान सादर केले. आपल्या वर्धापन दिनाच्या वेळी Chittpavan Samaj (R), Bengaluru यांनी एक शिष्यवृत्ती रु.२,००० + रु.१,००० अशी श्री वृक्षवर्धन हेब्बार गोखले यांना अध्यक्षांच्या हस्ते दिली.





...................................................

## मला समजलेले सत्य

**मला समजलेले सत्य**

**डॉ. अनघा आठवले, पुणे**
**९०४९१ ४४२२२**

सत्यमेव जयति नानृतं सत्येन पन्था विततो देवयानः। येनाक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा यत्र तत् सत्यस्य परमं निधानम् ॥मुण्डकोपनिषद् 3.1.6।।

सत्यम् एव जयति अनृतम् न सत्येन देवयानः पन्थाः विततः। येन आप्तकामाः ऋषयः आक्रमन्ति हि यत्र सत्यस्य तत् परमम् निधानम्॥

सत्यम् एव सत्यच
सत्य नपु. प्र. ए. व.
जयति जिंकते जी धातु कर्तरि लट् लकार परस्मैपद प्र. पु. ए. व.
न अव्यय

अनृतम् न ऋतं असत्य
न अनृतम् असत्याचा नाही
अनृतम् अनृत नपु प्र. ए. व.

सत्येन सत्याने सत्य नपु. तृ. ए. व.
देवयानः देवाकडे नेणारे वाहन देवयान पु. प्र. ए. व.

पन्थाः मार्ग पन्थ पु. प्र. ब. व.
विततः विस्तृत वि+तन् धातु+क्तः प्रत्यय पु. प्र. ए. व.

येन ज्याद्वारे यद् पु. तृ. ए. व.
आप्तकामाः तृष्णारहित (कामना तृप्त)
आप्तकाम पु. प्र. ब. व.

ऋषयः ऋषी ऋषि पु. प्र. ब. व.
आक्रमन्ति पोहोचतात क्रम् धातु
हि खरोखर अव्यय
यत्र जेथे अव्यय

सत्यस्य सत्याचे सत्य नपु. ष. ए. व.
तत् त्या तद् नपु प्र. ए. व.
परमम् श्रेष्ठ परम नपु द्वि. ए. व.
निधानम् आश्रयस्थान निधान नि+धा + आधारे ल्युट् प्रत्यय नपु. द्वि. ए. व.

आधीच्या मंत्रात आत्मज्ञान प्राप्त होण्यासाठी करावे लागणारे प्रयास, ह्या संबंधी भाष्य केले होते. त्यापैकी एक म्हणजे 'सत्य', त्याचे विवेचन ह्या मंत्रात दिले आहे.

सत्याचाच विजय होतो असे सुरवातीला म्हटले असल्याने सहाजिकच सत्य म्हणजे काय असा प्रश्न मनात येतो. जे डोळ्यांना प्रत्यक्ष दिसते तेच सत्य असे मानले तर कावीळ झालेल्या माणसाला सर्व काही पिवळे दिसते.

काही गोष्टी आपल्याला अज्ञानापोटी माहीतच नसतात ह्याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे आस्ट्रेलिया मध्ये 17 व्या शतकात आढळून आलेला काळा हंस. तोपर्यंत आपली हीच समजूत होती की हंस फक्त पांढराच असतो. म्हणजेच सत्य सापेक्ष आहे. ज्या गोष्टी नित्य असतात, अबाधित असतात त्यांना 'ऋत' म्हणतात.

ह्या सृष्टीचे नियम, विश्वातील व्यवस्था, सूर्य आणि पृथ्वीचे नाते हे सर्व नित्य आहे. सत्य एकटे नसते. त्याच्या बरोबर इतरही काही गोष्टी सत्य म्हणून सुसंगत किंवा सुसंवादी असतात. जसे दोरी आणि सापातील फरक. दोरी सरपटत नाही, आपल्याला दंश करत नाही म्हणून ती सर्प नाही.

ॲरिस्टॉटलने अतिशय सोपी सुटसुटीत मांडणी केली आहे. ''जे आहे त्याबद्दल, ते नाही असे म्हणणे आणि जे नाही त्याबद्दल, ते आहे असे म्हणणे असत्य होय; तर जे आहे त्याबद्दल, ते आहे असे म्हणणे आणि जे नाही त्याबद्दल, ते नाही असे म्हणणे सत्य होय''.
'ऋतं वच्मि सत्यं वच्मि' असे अथर्वशीर्षात मुद्दाम वेगळे सांगितले आहे.
सत्य जेव्हा नीतिमूल्य म्हणून येते, तेव्हा त्याचा अर्थ प्रामाणिकपणा. सत्य म्हणजे नैतिकता.
आत्मनः प्रतिकूलानि परेषां न समाचरेत् ।.जी गोष्ट लोकांनी आपल्याबरोबर केलेली आपल्याला आवडत नाही ती गोष्ट आपणही दुसऱ्या बरोबर करायची नाही.

म्हणूनच उपनिषदामधे
सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् , न ब्रूयात् सत्यम् अप्रियम् । प्रियं च नानृतम् ब्रूयात् , एष धर्मः सनातन: ॥ सत्य बोलावे, प्रिय बोलावे. अप्रिय सत्य बोलू नये, प्रिय असत्य बोलू नये हाच सनातन धर्म आहे, असे म्हटले आहे.
ऋतं सत्यं परं ब्रह्म।। श्री नारायण सूक्तम 13।।
शाश्वत सत्य आणि नैतिक सत्य हेच परब्रह्म आहे.

ऋत च्या विरूद्ध अर्थी शब्द अनृत.
ह्या मंत्राचा थोडक्यात अर्थ असा की
सत्यच बलवान असते, (म्हणून जिंकते) मिथ्या नाही. त्यामुळेच देवाकडे जाण्याचा मार्ग सापडत जातो. ज्यांच्या कामना पूर्ण झाल्या आहेत असे ऋषीगण याच सत्याच्या मार्गाने परमधामाकडे पोहोचतात.

.................................................

## सात कुटुंबे व अकरा बटू

### सात कुटुंबे व अकरा बटू

**श्री हरीभाऊ आठवले, पुणे**
**९८२३१ ६१३५२**

ही आहे माझ्या मुंजीची गोष्ट . खरं तर ही ११ जणांच्या सामुदायि क मुंजीची गोष्ट आहे. हा किस्सा १९४८ सालातील आहे.

ही कथा आहे उगार खुर्द या गावातील. माझे वडील उगार शुगर वर्क्स मध्ये नोकरीला होते. फॅक्टरीमध्ये काम करणाऱ्या ऑफिसर लोकांची कॉलनी होती आम्ही ११ जण त्यांची मुले होतो सगळे काही अगदी समवयस्क होतो असे नाही. पण सर्वांच्या मुंजी व्हायच्या होत्या. किंवा काही जण समवयस्क होते पण घरातील मोठ्या मुलाची मुंज सामूहिक होते आहे तर धाकट्या भावाची पण मुंज त्याबरोबरच उरकली असणार. पण असा सोहळा झाला होता हे अगदी खरे आहे. त्यावेळी आमचा काढलेला एकमेव ग्रुप फोटो साक्षीला आहे.

या ११ जणात साखर कारखान्याच्या मालकांची -शिरगावकरांची - मुले राजाभाऊ व प्रफुल्ल होते. त्यांच्या बंगल्याचे आवार मोठे होते. त्यांच्या बंगल्याच्या मोठ्या भिंतीवर ११ मखरे काढली होती. मांडवाची तेथून सुरवात होऊन सर्व कॉलनी मांडवाने जोडली गेली होती. बारा जणांची मोट बांधून हा सोहळा यथासांग पार पाडावयाचे म्हणजे योजकाचे व सातही कुटुंबांनी दाखवलेल्या सामंजस्याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे.

मुंजी लागल्यावर सर्वांचे जेवण एकत्र होते. संध्याकाळी मुंज्या मुलाची मिरवणूक काढली जाते. तशी आम्हा अकरा जणांची पण मिरवणूक निघाली होती. आम्ही सारे सजवलेल्या ट्रेलरवर (ऊसाची वाहतूक करण्यासाठी वापरला जातो तो) अकरा खुर्च्या अर्ध गोलात मांडून बसलो होतो. सर्वांनी सुरवार , नेहरू शर्ट व गांधी टोपी असा ड्रेस परिधान केला होता. ट्रेलर ओढायला ट्रॅक्टर होता आणि पुढे बॅण्ड अशा थाटात मिरवणूक फिरली

रात्री सर्व आलेल्या पाहुणे मंडळींसाठी कै इंदिराबाई खाडिलकरांचे सुश्राव्य शास्त्रोक्त गायन झाले. त्या काळात ज्या वस्तू मुंज्या मुलाला भेट म्हणून दिल्या जायच्या त्या आपापल्या नातेवाईकांनी दिल्या. पण वैशिष्ट्यपूर्ण भेट ठरली ती उगार कारखान्याच्या जिमखान्यातर्फे दिली गेलेली. त्यांना मुंज झालेल्या ११ जणात क्रिकेटची पूर्ण टीम दिसली म्हणून त्यांनी क्रिकेट खेळाचा संपूर्ण सेट भेट म्हणून दिला !

सर्व कुटुंबातील आलेली आप्तेष्ट व मित्रमंडळी एका आगळ्या वेगळ्या सोहळ्याचा आनंद आणि आठवणी घेऊन परतली होती.

हे कुणामुळे घडून आले व यात पुढाकार कोणाचा होता ह्याबद्दल पुढे कुणाशी चर्चा झालेली आठवत नाही . त्यामुळे आता मागे वळून पाहताना मला जे जाणवते ते असे आहे. उगार येथील 'श्री हरी विद्यालय' या शाळेचे संस्थापक कै नाना खाडिलकर होते. ते मुंबईला 'नवा काळ' या वर्तमानपत्राचे संपादक होते . ते गांधीवादी होते . त्यांना मुंबईची हवा मानवत नव्हती. त्याच सुमारास गांधीनी 'खेड्याकडे चला' अशी हाक कॉंग्रेस कार्यकर्त्यांना दिली होती. म्हणून उगार खुर्द या खेडेगावाची नानांनी निवड केली व ते उगारला स्थायिक झाले आणि तेथे समाजकार्य करावयास सुरुवात केली..

उगारला साखर कारखाना नुकताच सुरु झाला होता पण शाळा नव्हती . नानांनी स्वतःला

उगारच्या सर्वांगीण विकासाला वाहून घेतले होते. त्या निमित्ताने त्यांचे कारखान्याच्या सर्व अधिकार्यांबरोबर संपर्क असे . उगारच्या विकासासाठी त्यांना कारखान्याचे मालक कै विनायकराव शिरगावकर  यांची  खूप मदत होत असे. ते साधारणपणे दर दिवसाआड त्यांची भेट घेत असत. त्यांची कारखान्याच्या बोर्डावर मानद डिरेक्टर म्हणून नेमणूक झाली होती..

नाना म्हणजे 'चालते बोलते उगार' होते. त्यामुळे ही सामुदायिक मुंजीची कल्पना त्यांनी विनायकरावांच्या  समोर मांडली  असणार व ती त्यांनी उचलून धरली असणार. आणि मग पुढचे सर्व नियोजन नानांचे असणार. बटूंच्या पालकांना सामुदायिक मुंजीचे महत्व पटविणे व त्यांचे सहकार्य मिळवणे ही जबाबदारी नानांनी उचलली. त्यांचे दोन भाचे पण आमच्या ग्रुपमध्ये मुंजीसाठी सामील झाले होते.

रात्रीच्या गाण्याचा कार्यक्रम त्यांच्यामुळे झाला होता . कारण इंदिराबाई खाडिलकर नानांच्या जवळच्या नातेवाईक होत्या.  सुरवार-नेहरू शर्ट –गांधी टोपी या पोशाखाची कल्पना पण त्यांचीच असणार. देशाला नुकतेच स्वातंत्र्य मिळाले होते त्यामुळे असा पोषाख नानानीच सुचवला असणार.

"न  भूतो न भविष्यती" असा हा सोहळा कुठेही गडबड घोटाळा न होता जसं काही गावचच कार्य आहे अशा थाटात व उत्साहात पार पडला होता.

मुंज हा एक संस्कार मानला जातो.  फार पूर्वी मुंजीनंतर  बटू हा गुरुग्रही विद्या मिळवण्यासाठी जात असे. त्यामुळे मुन्जीसोबत घर सोडणे, लहान वयात आईपासून दूर जाणे, म्हणून होणारे मातृभोजन वगेरे घटनांमुळे तो एक विशिष्ट वयात घडणारा बदल हा संस्कार मानला गेला असावा. पुढे काळ बदलला, परिस्थिती बदलली तरी मुंज ही रूढी म्हणून चालू राहिली. मुंज झाली म्हणून मुलगा संस्कारित झाला अथवा मुंज झाली नाही म्हणून तो वाया गेला असे दिसत नाही.

मग हा संस्कार का चालू राहिला आहे? यावर माझ्या आईने दिलेले उत्तर समर्पक वाटते . माझ्या वडिलांचा मुन्जीवर विश्वास होता कि नाही मला माहित नाही. सामुदायिक समारंभ म्हणून त्यांनी मान्यता दिली असावी.

पुढे माझा मुलगा प्रसन्न जेव्हा मोठा झाला तेंव्हा त्याची मुंज आम्ही केली नाही. तेंव्हा माझ्या वडिलांनी मनापासून त्याला संमती दर्शवली . तरी पण माझ्या बायकोने –उषाने सासूबाईना म्हणजे माझ्या आईला विचारले. तेंव्हा तिने उत्तर दिले कि "माझ्या मुलाची मुंज करून माझी मिरवायची हौस फिटली आहे , तुला मिरवायची  हौस असेल तर तू तुझ्या मुलाची मुंज करायला मोकळी आहेस"

उत्तर पुरेसे बोलके होते. उशाला काही हा हौसेचा दिखावा  करण्यात रस नव्हता . तेंव्हा निर्विघ्नपणे प्रसन्नाची मुंज झाली नाही! आणि आजतागायत त्यामुळे त्याला कसलीही 'संस्काराची' उणीव भासली नाही!

श्री हरीभाऊ  आठवले

..................................................

## कविता - मनाचे रंग

**– सौ. सुलभा आठवले**
**८८८८८ ११८६१**

🌹 🌸 💐 ☘️ 🌻 🌺 🌸

वसंताचे बहुरंगी आगमन
निसर्ग उधळतसे सप्तरंग
मानवी मनाचे किती रंग
त्याला करितसे भावदंग.

आईच्या प्रेमाचे हळवे दर्शन
मातृत्वाचा अजोड *प्रीतिरंग.*
समर्थांचे रामचरणी समर्पण
अतुलनीय पवित्र *भक्तिरंग.*

पृथ्वीसम क्षमाशील असे कोण
विवेकी मानवाचा *क्षान्तिरंग.*
कामक्रोधाच्या सर्वच आधीन
नाथांचा नवलपूर्ण *शान्तिरंग*.

आठवणी, सुखदुःख, स्वप्नं
अति प्रिय असा हा *स्मृतिरंग.*
नको तो हव्यास,असमाधान
ज्ञानदेवांचा घ्यावा *तृप्तिरंग.*

सदाचारनीती, मर्यादा पालन
जानकीनाथाचा तो *रामरंग.*

मनाच्या रंगांचा हा शोभादर्शक
सुखकारक आणि मनमोहक
मानवी भावनांचे हे इन्द्रधनुष्य
मानवांना देई आनंदी आयुष्य.

🥀 🌸 🌻 ☘️ 🌷 🌹 🌸

...............................................

## फौंडेशनचा वर्धापन दिन - नाशिक

नाशिक येथील वर्धापनदिन रविवार २३ मार्च २०२५
नमस्कार,
आपल्या फाउंडेशनचा चौथा वर्धापनदिन रविवार २३ मार्च २०२५ रोजी श्री आनंद गजानन, नाशिक यांचे घरी साजरा करण्यात आला
श्री आनंद गजानन यांनी स्वागत व प्रास्ताविक करून प्रारंभ केला. परशुरामाच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन कार्यक्रमाला प्रारंभ झाला. सर्व उपस्थितांना फाउंडेशनच्या कामाविषयी माहिती देण्यात आली. तसेच सर्वांना सभासद होण्यासाठी आव्हानही करण्यात आले.
कार्यक्रमाला सहा जण उपस्थित होते.
यानंतरच्या कार्यक्रमात नाशिक येथे  कोणते कार्यक्रम घ्यायचे याविषयी विस्तार पूर्वक चर्चा झाली. तसेच कुलसंमेलनाचे फोटो आणि व्हिडिओ वेबसाइट वर उपलब्ध कधी होतील या विषयी सुद्धा चर्चा झाली.
या कार्यक्रमानंतर सर्वांनी अल्पोपहारचा आस्वाद  घेतला व कार्यक्रमाची सांगता झाली.
श्रीनिवास



...............................................

## फौंडेशनचा वर्धापन दिन - पुणे

पुणे येथे १६ मार्च २०२५ रोजी आपल्या संस्थेचा ४ था वर्धापन दिन कार्यक्रम सेवा भवन, एरंडवणे, पुणे येथे संध्याकाळी ५.३० ते ८.३० साजरा झाला. परशुराम पूजन व दीप प्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ती. सुमतीताई आठवले यांनी त्यांचे दिवंगत यजमान कै. माधवराव आठवले यांचे स्मरणर्थ देणगी दिली. त्यांचे आभार मानून कै माधवरावाना आदरांजली अर्पण करण्यात आली. आपले एक सदस्य दत्तात्रय आठवले यांनी त्यांच्या मातोश्रीच्या 101 व्या वाढदिवसानिमित्त काही मंडळींचे सामाजिक कार्याबद्दल सत्कार केले होते त्याची माहिती उपास्थित मंडळीना देण्यात आली. श्री सुदर्शन आठवले यांना 'The Difficulty of Being Good' या Gurucharan Das यांच्या पुस्तकाच्या भाषांतरासाठी साहित्य अकादमीचा २०२४ चा मा नाचा पुरस्कार मिळाला.
त्यानिमित्त अध्यक्षांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.
मुख्य आकर्षण होते ते ‘माझिया मना’ हा सौ वृषाली मावळणकर-आठवले यांचा अप्रतिम सांगितिक कार्यक्रम. त्यांनी अनेक हिंदी मराठी गाणी उत्तम रित्या सादर केली. सर्व मंडळींनी त्याला भरघोस प्रतिसाद दिला. शेवटी आपल्या संस्थेचे अध्यक्ष श्री अनिल महादेव यांनी आभार व्यक्त केले व जास्तीत जास्त सभासद होण्यासाठी आवाहन केले.
सांगतेस सर्वांनी म्हणजे ५० उपस्थितांनी अल्पोपहाराचा आस्वाद घेतला.
🙏👌👏

त्या कार्यक्रमाची काही क्षणचित्रे








..................................................

## सौ शैला मुकुंद यांचा सन्मान

लेखिका सौ शैला मुकुंद यांना पहिला 'विद्याताई अभिषेकी स्मृती पुरस्कार' हा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी पं शौनक अभिषेकी, पं सत्यशील देशपांडे, उज्ज्वल केसकर, डॉ सतीश देसाई उपस्थित होते. अभिषेकी बुवांवर पुस्तक लिहीत असताना विद्यताई यांचा सहवास लाभला आणि त्यांचे व्यक्तिमत्व उलगडत गेले. त्यांच्या नावाने मिळालेला हे पुरस्कार महत्वाचा आहे असे शैला मुकुंद म्हणाल्या.

## फौंडेशनचा वर्धापन दिन - मुंबई

१६ मार्च २०२५ रोजी श्री उन्मेश आठवले यांचेकडे, २५ आठवले सदस्यांच्या उपस्थितीत साजऱ्या झालेल्या चौथ्या वर्धापन दिन सोहोळा व २०२६ मध्ये ठाणे येथे (दिवाळी नंतर व ख्रिसमस पूर्वी) आयोजीत करण्यात येणाऱ्या एकदिवसीय कुलसंमेलना संबंधी सविस्तर चर्चा होऊन मुख्य संचालक मंडळ (पुणे) तर्फे श्री विनायक विष्णू आठवले व सौ यशश्री आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली, मुख्य आयोजक समितीसकट विविध समित्यांची आखणी करण्यात आली. २०२६ च्या कुलसंमेलनासाठी मुंबई केंद्राची निवड झाल्यामुळे सर्व कार्यकर्त्यात उत्साहाचे वारे होते. सांगतेस चविष्ट अल्पोपहार ही झाला.





..............................................

## एक विशेष व अभिमानास्पद घटना

**श्री दत्तात्रय पुरुषोत्तम आठवले, पुणे**

रविवार ९ मार्च रोजी आमच्या आईचा "ती. शांता पुरुषोत्तम आठवले" हिचा "१०१ वा वाढदिवस" पुणे येथे साजरा केला.

कार्यक्रमाची सुरुवात "गणेश पूजन" व "भारत माता पूजनाने" झाली. त्यानंतर "अथर्वशीर्ष" आणि "एकात्मता मंत्र" सर्वांनी मिळून म्हटला. आईच्या "पतवंडांनी" गायन व तबला आणि बासरी वादन केले.

यावेळी सामाजिक काम करणाऱ्या चार महिलांना कृतज्ञतापूर्वक "शांता व पुरुषोत्तम पुरस्कार" दिला. रुपये २५,००१/- प्रत्येकी व सन्मान चिन्ह.

-- सुमेधा ताई चिथडे
सैन्यासाठी "ऑक्सिजन जनरेशन अँड रिफिलिंग प्लांट"

-- पुनम ताई मेहता
"मुळशी तालुक्यात", तसेच "जनकल्याण समिती", "पूर्वांचल विकास" कामात मोठा सहभाग.

-- स्वातीताई कदम.
"मुळशी तालुक्यात" ५५ गावात ९५ बचत गट स्थापन केले व जवळपास "२,००० महिलांच्या सबलीकरणासाठी" प्रयत्न.

-- डॉ माधुरी ताई डोंगरे.
संगीत क्षेत्रात स्वतः डॉक्टरेट मिळवली. त्यांच्या तीन विद्यार्थिनींना डॉक्टरेट मिळाली. आणि अजून पाच विद्यार्थिनींच्या त्या गाईड. "शास्त्रीय संगीतात दोन नवीन रागांची निर्मिती" व त्याला मान्यता.

त्यानंतर "सदाफुली सुमंगल संस्थे"मार्फत "कै काका आठवले वसतीगृहाला" निधी दिला.

शेवटी पुण्यातील कात्रज ते कोंढवा रस्त्यावरील **"कै. बाळासाहेब देवरस रुग्णालयाला" रु २५ लक्ष असा भरघोस कृतज्ञता निधी दिला.** पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.






मागील वर्षी ती. आईचा १०० वा वाढदिवस अशाच पद्धतीने साजरा केला होता. त्यावेळी **विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर, पंचांग कर्ते मोहन दाते, प्रा. अनिल व्यास यांच्या पत्नींना व सांगलीच्या मालती ताई जोशी** यांना कृतज्ञतापूर्वक "शांता व पुरुषोत्तम पुरस्कार" दिला होता.

**..............................................**

## इनोव्हेशनचा 'परिस' स्पर्श

**--- श्री कमलेश पांडे**

'इनोव्हेशन' या शब्दाचा अर्थ प्रत्येक जण आपल्या सोयी किंवा गरजेनुसार लावतो. त्यामुळे बहुतेक कंपन्यांत इनोव्हेशनसंबंधी हवी तशी एकसूत्रता आढळून येत नाही. सोप्या भाषेत सांगायचं झालं तर इनोव्हेशन ही एक प्रक्रिया आहे जिची सुरुवात नवीन कल्पना अथवा ज्ञानाने होते आणि शेवट धनार्जनात. येथे 'धन' म्हणजे वेल्थ ज्यात पैसा, शिक्षण, आरोग्य, सुरक्षा, सामाजिक आरोग्य  इ. चा समावेश होतो.

मात्र या लेखात आपण धनाचा अर्थ पैशापुरताच मर्यादित ठेवू. नवीन कल्पनेचे पैशात रूपांतर होते ते नवीन उत्पादन, प्रक्रिया  अथवा सेवा यापैकी एकाद्वारे. नवीनतम उत्पादने अथवा सेवा निर्माण करण्याप्रमाणेच विद्यमान उत्पादने नवीन अथवा निराळ्या पद्धतीने निर्माण करणे म्हणजे देखील इनोव्हेशनच.

हे सारे घडत असताना कंपनीतील कर्मचारी आपसांत अथवा बाहेरच्या जगाशी सतत परस्परसंवाद साधत असतात. यशस्वी इनोव्हेशनचा हा एक महत्वाचा घटक आहे. यामुळे इनोव्हेशन ही एक लोककेंद्रित प्रक्रिया आहे हे सहज लक्षात येते.

इनोव्हेशन म्हणजे केवळ सर्जनशीलता अथवा ' चौकटीबाहेरचा विचार ' असा बहुतेकांचा समज असतो. मात्र  सर्जनशीलता हा इनोव्हेशनचा केवळ पूर्वार्ध आहे. प्रत्यक्ष कार्यवाही (ठोस कृती) हा उत्तरार्ध तेवढाच महत्वाचा आहे, ज्याद्वारे नवीनतम उत्पादन अथवा सेवा निर्माण होतात. किंबहुना कार्यवाही  हा इनोव्हेशनचा कणा मानला  जातो.

इनोव्हेशनमध्ये कार्यशोध असतो, तर इन्व्हेन्शन हा तथ्यशोध. म्हणजेच ही वेगळी संकल्पना आहे. मात्र त्यामधे बऱ्याच जणांची गफलत होते,

ज्याचे निराकरण करणे गरजेचे आहे. इन्व्हेन्शन वैयक्तिक परिश्रमाने साध्य होऊ शकते मात्र इनोव्हेशन सांघिक प्रयत्नांशिवाय जवळजवळ अशक्य असते. इन्व्हेन्शन सहसा व्यवसायाशी निगडित नसते. याउलट,

वर नमूद केल्याप्रमाणे, इनोव्हेशन पूर्णतः व्यावसायिक स्वरूपाचे असते. इन्व्हेन्शन प्रथम जन्मास येते आणि काही कालावधीनंतर ठोस कृतीद्वारे त्याचे रूपांतर इनोव्हेशनमधे होते. हा कालावधी पूर्वी बराच जास्त (काही दशके,वर्षे) असायचा, मात्र जलद गतीने विकसित आणि उपलब्ध होणाऱ्या तंत्रज्ञानामुळे हाच कालावधी आता केवळ काही आठवडे किंवा दिवसांवर आला आहे ! लक्षात ठेवण्यालायक गोष्ट ही की एका इन्व्हेन्शनपासून अनेक इनोव्हेशन निर्माण होऊ शकतात. तसेच अनेक इन्व्हेन्शन एकत्रित करून एक प्रभावी इनोव्हेशन निर्माण होऊ शकते.

गुणवत्तावान उत्पादन अथवा सेवा यांच्या विक्रीतून पैसा मिळविण्याचे एकमेव स्थान म्हणजे बाजारपेठ. बाजारपेठेत जीवघेणी स्पर्धा असते हे सांगणे न लगे. या बाजारपेठेचा केंद्रबिंदू असतो ग्राहक. प्रगतिशील आणि इनोव्हेशनप्रणित कंपन्या अथवा उत्पादक हे ओळखून असतात की ग्राहक दोन प्रकारचे असतात. इंटर्नल आणि एक्सटर्नल. दोन्ही प्रकारच्या ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सतत ते झटत असतात. तसेच त्यांच्या ग्राहकांशी सतत संवाद साधून त्यांना त्यांच्या सुप्त गरजांविषयी संवाद साधण्यास प्रवृत्त करतात आणि त्यांच्या आशाआकांक्षा पूर्णत्वाला नेण्यात सक्रीय मदत करतात. त्याचप्रमाणे सेवा न पुरवलेल्या अथवा तुटपुंज्या सेवा पुरवलेल्या क्षेत्रातील बाजारपेठांत आपल्या उत्पादनांची विक्री करण्यास सतत प्रयत्नशील असतात.

अशाप्रकारे गरजांचा शोध हे इनोव्हेटिव्ह कंपन्यांचे अतिशय परिणामकारक शस्त्र होय. थोडक्यात, पारंगत इनोव्हेटर्स ग्राहकांच्या गरजांचा सखोल अभ्यास करून त्यांनाच उत्पादनात भागीदार करून घेतात.

आता यशस्वी इनोव्हेटर कोणाला म्हणायचे हे बघू. ' हार्वर्ड बिझिनेस रिव्ह्यू ' मधील एका लेखानुसार आंतरराष्ट्रीय पातळीवरील यशस्वी इनोव्हेटर्सच्या ठायी काही विशिष्ट खुबी असतात.
त्यातील प्रमुख या आहेत.

**(१)** जोडलेपण : कुठेही कसलीही समस्या असो, ही खुबी असलेल्या व्यक्ती ती समस्या आपलीच आले अशा थाटात तिला सामोरे जातात आणि तिचे निराकरण करण्यासाठी झटतात.
**(२)** चिकित्सा : कुठल्याही समस्येच्या उपायांवरील चर्चेत ह्या खुबीधारक व्यक्ती हेच का?, हे असेच का?, ते का नाही?, ते तसे का नाही? अशा व तत्सम प्रश्नांचा भडिमार करतात. परिणामतः त्या अनेक पर्याय निर्माण करतात आणि त्यातून सर्वदृष्टीने योग्य तो निवडण्यास मदत करतात. मात्र अशा व्यक्ती साहजिकच इतरांना नकोशा वाटतात.
**(३)** निरीक्षण : द्रष्टा इनोव्हेटर इतरांसारखे केवळ बघून संतुष्ट होत नाही. तो प्रत्येक गोष्ट आणि परिस्थिती यांचे बारकाईने निरीक्षण करतो. आपल्याच रतन टाटांनी साकारलेली 'नॅनो' मोटार ही या खुबीच साक्षात उदाहरण आहे.
**(४)** प्रयोगशीलता : ह्या खुबीच्या व्यक्ती त्यांच्या कल्पनांना आणि विचारांना लगेच कृतीत उतरवतात व रचनात्मक रूप देतात. अभियांत्रिकी भाषेत यालाच ' प्रोटोटायपिंग ' म्हणतात. योग्य चाचण्या आणि सुधारणा केल्यानंतर त्यांना अंतिम रूप देतात.
बहुतांश लोकांचा असा ठाम समज असतो की इनोव्हेशन केवळ संशोधन आणि विकास विभागातच घडते. एवढेच नव्हे तर, ते फक्त प्रसिद्ध विद्यापीठातून पीएच डी मिळविलेल्या बुद्धिमान अभियंत्यांचे किंवा वैज्ञनिकांचेच काम आहे. हा पूर्णपणे चुकीचा तसेच प्रतिगामी समज आहे. खरे तर इनोव्हेशन आपल्या शिक्षणाची शाखा, पदवी, विद्यापीठ,अनुभव, यांपैकी कशावरही अवलंबून नसते. (अन्यथा कुठल्याही उत्पादन क्षेत्रातल्या कंपनीतील शॉप फ्लोअरची इनोव्हेटिव्ह विभागांपैकी एक अशी ओळख

निर्माण झाली नसती). उलट, इनोव्हेशन साध्य करण्यास उत्कट आवड, चिकाटी, जोखीम घेण्याची धमक आणि अपयश पचविण्याची मानसिकता या गुणांची अधिक आवश्यकता असते.

लेखकाच्या अनुभवावर आधारित इनोव्हेशनचे तीन आधारस्तंभ आहेत.

यातील **पहिला** म्हणजे दुर्लक्षित क्षेत्र  निवडणे. आजवर दुर्लक्षित असलेल्या कार्यक्षेत्रांत इनोव्हेशनसाठी भरपूर संधी उपलब्ध असतात. त्या ओळखून त्यांवर लक्ष केंद्रित केल्यास कमीतकमी संसाधने वापरून जास्तीतजास्त लाभ पदरी पाडून घेता येतो.

**दुसरा** मुद्दा  आहे तो ग्राहकाला दिलेल्या नकारात्मक प्रतिसादांच्या सूचीचा वेळोवेळी आढावा घेऊन केलेले  विश्लेषण.
बहुतेक कंपन्यांमध्ये ग्राहकांच्या विनंतीला प्रथम नाकारघंटेचा प्रतिसाद मिळतो. ही मानसिकता जगभर दिसून येते. पण त्यामुळे आपण इनोव्हेशन अमलात आणण्याच्या अनेक संधी गमावून बसतो याची पुसट कल्पनाही कर्मचाऱ्यांना नसते. याचे लक्षणीय व दूरगामी परिणाम लवकर दिसून येतात.

**तिसरा** महत्वाचा मुद्दा म्हणजे  प्रत्येक कंपनी, संस्था, प्रांत अथवा देश त्यांच्या स्वतःच्या विशेष क्षमता, पूर्वानुभव, संसाधने आणि संस्कार यांच्या जोरावर काही विशिष्ट क्षेत्रांत अद्वितीय कार्य करण्यास समर्थ असतात.
जसे भारतात बांबू उत्पादन व संबंधित वस्तू अथवा  एखाद्या वाहन कंपनीत केले जाणारे सौन्दर्यात्मक आरेखन ( एस्थेटिक डिझाईन ). अशा विशिष्ट क्षेत्रांत विकास करून इनोव्हेशन कार्यात एक नवीन उंची गाठण्यास भरघोस मदत होते. अशा क्षेत्रांत स्पर्धेची फारशी भीती नसते.

उद्योजक आणि स्टार्टअप्स यांचा गाभाच मुळी इनोव्हेशन असतो. नव्हे, असावाच. गेल्या दशकात तरुणाईचा कल उद्योजक बनण्यात स्पष्ट दिसून येतो. यात केवळ अभियंतेच नाही तर विज्ञान, वाणिज्य, कला या शाखांचे  विद्यार्थी देखील सामील आहेत. ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

तेव्हा इनोव्हेशन म्हणजे काय, ते काय नाही, त्याचे भिन्न पैलू , त्याचे व्यवस्थापन कसे करतात, इ विषयीचे धडे व जमल्यास  काही केस स्टडी द्वारे विवेचन महाविद्यालयातच नाही तर प्राथमिक पातळीवर शाळांतदेखील अंतिम दोन वर्षांत देण्यात यावे.  ते बाळकडू तरुणाईसाठी अत्यंत महत्वाचे ठरेल यात संदेह नाही.

कमलेश पांडे

*****************************************
लेखक काही नामांकित कंपन्यांतील निवृत्त इनोव्हेशन प्रमुख आहेत.  आय आय टी मुंबईच्या  स्कूल ऑफ मॅनेजमेंट मध्ये त्यांनी अध्यापनही  केले आहे.

**तळटीप: हा लेख याआधी सकाळ मध्ये प्रकाशित झालेला आहे**



**कु. अवंती अमोल वर्तक (इयत्ता ८ वी ) लोणावळा**

## तिसरे कुल संमेलन

**<u>दिनांक 11 व 12 जानेवारी 2025 रोजी नाशिक येथील श्री स्वामी समर्थ मंगल कार्यालय येथे आठवले कुलसंमेलन संपन्न झाले</u>.**

संमेलनाला जवळपास सव्वाशे आठवले कुलातील सदस्य उपस्थित होते. मागील दोन संमेलनापेक्षा या संमेलनाला असलेली उपस्थिती ही निम्म्यापेक्षाही कमी होती तरीही नाशिककर मंडळींनी आपल्या कार्यक्रमाची आखणी व त्याची अंमलबजावणी अतिशय उत्साहाने केली.

दिनांक 11 जानेवारी रोजी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास नाव नोंदणी कार्यक्रम स्थळी सुरू करण्यात आली आणि जवळपास 120 लोकांनी आदल्या दिवशीच आपली उपस्थिती नोंदवली यामुळे संमेलनाची रंगत वाढली. आलेल्या कुटुंबांना आठवले फाउंडेशन मार्फत भेटवस्तू व सुसंवाद त्रैमासिक व खाऊ देण्यात आला. उपस्थितांच्या चहा पाण्याची व्यवस्था कार्यक्रम स्थळी करण्यात आली होती. सौ उमा यांनी गणपती स्तोत्र व जोगवा म्हणून गाण्याच्या कार्यक्रमाची सुरुवात केली.



संध्याकाळी साडेसहा च्या सुमारास श्रीयुत निनाद राम  सौ मधुरा कुणाल यांनी इतर गायक मंडळी सोबत गाण्याच्या कार्यक्रमाला सुरुवात केली. या सर्वांच्या गाण्यांनी श्रोत्याना मंत्रमुग्ध केले. हा कार्यक्रम जवळपास दोन अडीच तास चालला व सर्व प्रेक्षकांचे कान या गाण्यांनी तृप्त झाले. या गाण्याच्या कार्यक्रमाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे पाच वर्षाच्या उमा अमर आठवले हिने खणखणीत सुरात म्हटलेली कविता. आपल्या या कुलसंमेलनाच्या कार्यक्रमामुळे आपल्यातील कलाकारांना स्टेजवर सादरीकरण करण्याची एक संधी आपण उपलब्ध करून देऊ शकतो व स्टेजवरील सादरीकरण करण्याची हिम्मत त्यांच्यात आपण निर्माण करू शकतो.
गाण्याच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ नीलाक्षी निनाद यांनी केले. सर्वांनी भोजन करून दुसऱ्या दिवशी दिनांक 12 रोजी सकाळी आठ ते साडेआठ पर्यंत कार्यक्रम स्थळी हजर राहावे अशी सूचना केली




दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता सर्व सदस्यांचे कार्यक्रम स्थळी आगमन होऊ लागले. कार्यक्रमाला येणाऱ्या सर्वांना तिळगुळ देऊन व अत्तर लावून त्यांचे स्वागत करण्यात आले. सकाळी आठ ते साडेनऊ वाजेपर्यंत सदस्यांसाठी चहा व नाश्त्याची कार्यक्रम स्थळी व्यवस्था करण्यात आली होती
सकाळी नऊ वाजल्यापासून सौ नीलाक्षी निनाद यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आपल्या हाती घेऊन कार्यक्रम पुढे सुरू केला.
सकाळी बरोबर नऊ वाजता आपल्या प्रमुख पाहुण्या सौ वीणाताई रामकृष्ण आठवले हुबळी यांचे आठवले फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल महादेव व उपाध्यक्ष श्रीकांत गोपाळ व सौ यशश्री यांच्यासोबत आगमन झाले. प्रमुख पाहुण्या, फाउंडेशनचे अध्यक्ष, नाशिक कुलसंमेलनाचे अध्यक्ष यांच्या हस्ते परशुराम, आंबेजोगाई व व्याडेश्वर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळेस सौ मधुरा कुणाल हिने इशस्तवन म्हटले.

त्यानंतर पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. प्रथम दिवंगत आठवले सदस्यांचे पुण्यस्मरण करून त्यांना आठवले फाउंडेशन व सदस्या मार्फत श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर नाशिक कुलसंमेलनाचे अध्यक्षांनी आपले प्रास्ताविक व मनोगत सर्वांसमोर मांडले. यानंतर 2023 कुलसमेलन त २०२५ कुलसमेलन पर्यंत ज्याना 75 वर्ष पूर्ण झाली आहेत अशांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. यानंतर स्वप्निल महादेव यांनी सांस्कृतिक मंडळाच्या कामाविषयी थोडक्यात माहिती सांगितली.



या कार्यक्रमा नंतर फाउंडेशनचे अध्यक्ष श्री अनिल महादेव यांनी आपले मनोगत मांडले. या कार्यक्रमा नंतर सुसंवाद त्रैमासिकाच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले व त्यानंतर प्रमुख पाहुण्या सौ वीणाताई रामकृष्ण आठवले यांचा फाउंडेशन मार्फत सत्कार करण्यात आला. यानंतर सौ नीलाक्षी निनाद यांनी विणाताईंची ओळख सर्वांना करून दिली. विणाताई या त्यांच्या सिंधुताई सपकाळ यांच्यावरील नाटकामुळे कर्नाटकामध्ये बऱ्याच लोकांना माहिती आहेत. त्यानंतर प्रमुख पाहुण्या सौ वीणाताई रामकृष्ण आठवले यानी आपले मनोगत मांडले व कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून बोलावल्याबद्दल फाउंडेशनचे आभार मानले.

पुढील कार्यक्रमात श्री सतीश राम व श्रीकांत गोपाळ यांनी वेबसाईट व कुलवृत्तांचा विषयीची माहिती सर्वांना प्रात्यक्षिका मार्फत दिली. तसेच सर्वांना आग्रहाने विनंती केली की कुलवृत्तानताचे नूतनीकरण करायचे असल्यामुळे सर्व सभासदांनी आपली अद्यावत माहिती फाउंडेशनला पाठवावी व त्यासाठी दिलेला फॉर्म लवकरात लवकर भरून फाउंडेशन कडे पाठवावा. तसेच सतीश राम यांनी आवर्जून विनंती केली की कोणालाही वेबसाईट बद्दल व कुलवृत्तांत अद्यावत करण्याबाबत काही शंका असल्यास ते त्यांना पर्सनल वर फोन करूनही संपर्क साधू शकता. या कार्यक्रमांमध्ये बऱ्याच लोकांनी उत्साह पूर्व भाग घेऊन आपले शंका व प्रश्न मांडले.



या कार्यक्रमानंतर  अनुराधा आठवले घाणेकर यांनी गुरुचरित्राचे विज्ञाननिष्ठ मराठीत केलेले भाषांतर यावर व्याख्यान दिले. यामुळे लोकांसमोर गुरुचरित्राचे अजून एक स्वरूप उभे राहिले. ही सर्व माहिती लोकांना नवीन व त्यांची उत्सुकता वाढवणारी होती.




या कार्यक्रमानंतर सर्वांनी दुपारच्या भोजनासाठी प्रस्थान केले. दुपारच्या स्नेहभोजनानंतर सर्व उपस्थित परत एकत्र पुढील कार्यक्रमांसाठी जमले.यानंतर पोर्णिमा शरदचंद्र आठवले यांनी वारली कला याविषयी लोकांना माहिती दिली. त्यांचा या विषयावरील अभ्यास व अनुभव त्यांनी लोकांपुढे मांडला.

तसेच सभागृहात त्यांनी त्यांच्या वारली चित्रकलेच्या नमुन्यांचे प्रदर्शन भरविले होते. तेही लोकांना खूप आवडले.
यानंतर आयसीसी वर्ल्ड कप मध्ये खेळलेल्या नाशिकच्या श्री प्रतीक श्रीकांत आठवले यांची मुलाखत सादर करण्यात आली.

यानंतरच्या खुला मंचच्या कार्यक्रमात कर्नल राम वसंत आठवले यांनी CBRN या विषयावरील माहिती लोकांस दिली. लोकांना एक नवीन विषय माहित झाला.

यानंतर फाउंडेशनचे अध्यक्ष श्री अनिल महादेव यांनी नाशिक कार्यकरीणीतील सर्वांना छोटीशी भेटवस्तू देऊन त्यांचे आशीर्वाद दिले. नंतर श्रीयुत निनाद व त्यांच्या सहगायकांनी पसायदान सादर केले. कार्यक्रमाची सांगता सौ अपर्णा मंदार गुहागर यांनी संपूर्ण वंदे मातरम म्हणून केली. या गीतास दीडशे वर्ष पूर्ण झाली असल्यामुळे या गीताने आपण कार्यक्रमाची सांगता केली.



सर्व सभासदांना घरी जाताना बरोबर शिधा म्हणून पुरी भाजीचे एक पॅकेट प्रतिव्यक्ती देण्यात आले. सर्व सभासदांनी उत्स्फूर्तपणे नाशिककरांनी सादर केलेल्या कुलसंमेलनाला मनापासून टाळ्या वाजवून  पोचपावती दिली.

2025 च्या कुलसंमेलनाची सांगता होत असताना ठाणे येथील स्वप्निल महादेव व त्यांच्या सहकार्यांनी 2026 मधील कुलसंमेलन ठाणे येथे आयोजित करणार असल्याचे जाहीर केले




**नाशिककर संमेलन कार्यकारणी मार्फत उपस्थित सर्व सभासदांचे मनापासून आभार.**



.................................................



**श्रीरंग आठवले**

## सांस्कृतिक मंच अहवाल

**२७ ऑक्टोबर २०२४**
**कार्यक्रम क्र. ४३**
**समस्या महिलांच्या – सौ. शुभांगी कोपरकर**

वंचित, पिडीत, अत्याचारीत महिलांसाठी विश्वसनीय आधार असलेल्या स्नेहधार - पुणे या संस्थेच्या प्रकल्पांचे यशस्वी नेतृत्व करणाऱ्या व अध्यापन सोडून सामाजिक कार्याला वाहून घेतलेल्या शुभांगीताई यांच्याकडून कधीच ऐकले नसतील असे पिडीत महिलांचे अनुभव ऐकायला मिळाले.

.

**२४ नोव्हेंबर २०२४**
**कार्यक्रम क्र. ४४**
**शेअर मार्केट मधील गुंतवणूक, समृद्धीचा राजमार्ग – जितेंद्र शंकर अभ्यंकर**

शेअर मार्केट आणि मुचुअल फंडामध्ये बँकेतील व्याजापेक्षा खूप जास्त पैसे मिळतात आणि कधी बुडतातही एवढेच सामान्य माणसाला माहीत असते. या गुंतवणीवर सखोल अभ्यासपूर्ण भाषण श्री. जितेंद्र यांनी दिले.

**२२ डिसेंबर २०२४**

**कार्यक्रम क्र. ४५**

**आयुर्वेद: सुखी जीवनासाठी - वैद्य सौ. अरुणा टिळक**

सौ अरुणाताई गेली ३० वर्षे आयुर्वेदाचा दवाखाना चालवत आहेत ." नियोजन आहाराचे " या त्यांच्या पुस्तकाला चार पुरस्कार मिळाले आहेत. सुखी आणि समाधानी जीवन जगण्यासाठी आयुर्वेदाचा कसा उपयोग होतो हे त्यांनी समजावून सांगितले .

**जानेवारी २०२५ मधे नाशिक कुल संमेलनामुळे मंचाचा वेगळा कार्यक्रम झाला नाही – कार्यक्रम क्र. ४६**

**२५ फेब्रुवारी २०२५**

**कार्यक्रम क्र ४७**

**मृत्युपत्र ( इच्छापत्र ) - सौ . उल्का पद्मनाभ आठवले**

मृत्युपश्चात आपली स्वकष्टार्जित संपत्ती आपल्या इच्छेप्रमाणे विनासायास आपल्या वारसांना मिळावी यासाठी मृत्युपत्र का व कसे करावे हे उल्काताई यांनी नीट समजावून सांगितले.

**२२ मार्च २०२५**

**कार्यक्रम क्र. ४८**

**CBRN ( धोके आणि राष्ट्रीय सुरक्षा ) - --- कर्नल राम आठवले**

Chemical, Biological , Radiological and Nuclear ( CBRN ) या विषयामध्ये राष्ट्रीय सुरक्षेला असलेले धोके आणि प्रतिबंधात्मक उपाय या विषयात डॉक्टरेट मिळवलेले कर्नल राम साठे यांनी समजावून सांगितले

....................................................

## काही निवडक घडामोडी

**कुमार आठवले ९४२२० ०७५६२**

नुकत्याच घडलेल्या व देशाच्या दृष्टीने चांगल्या, अशा खूप गोष्टी आहेत. पण त्यातील काही बातम्या खाली देत आहे. आपण यातील काही बातम्या कदाचित् वाचल्या असतील. तरी पण आपणासाठी परत एकदा पाठवत आहे.

**१)** ३० डिसेंबर २०२४ रोजी स्पेडेक्स मोहिमे" अंतर्गत २२० किलो वजनाच्या "दोन उपग्रहांचे" यशस्वी "प्रक्षेपण" इस्रो ने केले.

त्याचा पुढील टप्पा म्हणजे त्या दोन उपग्रहांना जवळ आणून "डॉकिंगची" म्हणजे जोडण्याची कृती १६ जानेवारी रोजी पूर्ण झाली.

**२)** २९ जानेवारी रोजी "जी एस् एल् व्ही एफ् १५" च्या साह्याने "एनव्हीएस ०२" या अद्ययावत उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण झाले. हे इस्रोचे "१०० वे यशस्वी प्रक्षेपण" होते.

**३)** २०२३-२४मध्ये १ लाख २७ हजार कोटी रुपयांची संरक्षण सामुग्री भारतात बनली. सध्या भारतीय लष्कराला लागणाऱ्या एकूण सामुग्री पैकी ६५% सामुग्री ही भारतात बनते.

**४)** १६ जानेवारी २०१६ रोजी केंद्र सरकारने "स्टार्टअप" साठी योजना जाहीर केली. त्यामध्ये नवीन स्टार्टअप सुरू व्हावेत. व त्यांना अडचणी येऊ नयेत यासाठी उपाययोजना केली. या योजनेमध्ये ज्या स्टार्टअप चा "प्रकल्प मान्य" होईल व प्रोटो टाईप किंवा प्रॉडक्ट ट्रायल सुरू होईल, अशांना "रुपये २० लाख" अनुदान दिले जाते.

**५)** २००२ साली मा. अटलजींच्या काळात "मेट्रो"च्या कामाला सुरुवात झाली. आणि सध्या "२३ शहरातून १,०११ किलोमीटर" मेट्रो मार्गिका आहे. अजून "९७९ किलोमीटर" लांबीच्या मेट्रो मार्गिकेचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण झाल्यावर एकूण "२९ शहरातून १,९९० किमी मार्गिकेवर मेट्रो" धावू लागेल.

**६)** "महाकुंभ मेळा"

दर ३ वर्षांनी "कुंभमेळा" "हरिद्वार, प्रयागराज, उज्जैन आणि नाशिक" येथे भरतो. दर ६ वर्षांनी "अर्ध कुंभमेळा" "प्रयागराज व हरिद्वार" येथे भरतो. आणि प्रत्येक "१४४ वर्षांनी" "महा कुंभमेळा" "प्रयागराज" येथे भरतो.

१३ जानेवारी २०२५" (मकर संक्रांति) पासून "२६ फेब्रुवारी २५" (महाशिवरात्री) पर्यंत प्रयागराजला गंगा, यमुना व सरस्वती नद्यांच्या संगमात "महाकुंभ मेळा" संपन्न झाला.

१४४ वर्षांनी येणाऱ्या या महाकुंभ मेळाव्यास ४० कोटी पेक्षा जास्त भावीक येतील. असा अंदाज उत्तर प्रदेश सरकारने केला आणि त्या दृष्टीने सर्व व्यवस्था चोख ठेवली . असा अंदाज करणे ही कठीण आणि प्रत्यक्षात तर ह्या ४५ दिवसात, ७० देशातून ६६ कोटी पेक्षा जास्त भाविकांनी (यात ५० लाख परदेशी नागरिक) महाकुंभ मेळाव्यात सहभागी होऊन "अमृतस्नान" केले. "४,००० हेक्टर" परिसरात झालेल्या या "महा कुंभा"साठी "१,६०,००० तंबू", "९ नवीन घाट", "२२ नवीन पूल", "४०० किमी चे रस्ते", "६७,००० दिवे", "१.५ लाख स्वच्छता गृहे", उभी केली होती. १०,००० स्वच्छता कर्मचारी नेमले होते. आणि ३ लाख नवीन झाडे, लावली आहेत .

**७)** २७ जानेवारी रोजी उत्तराखंडमध्ये "समान नागरी कायद्याची" अंमलबजावणी सुरु झाली. त्यामुळे आता उत्तराखंड मध्ये सर्वांच्यासाठी एकच कायदा असेल.

**८)** भारतात मार्च २५ मध्ये दररोज "५९ कोटी" पेक्षा जास्त UPI पेमेंट केली गेली आणि त्याची रक्कम "६ लाख ६८ हजार कोटी" रुपये आहे.

.....................................................

## पाककृती - केशरी साखर भात

**सौ उमा सतीश आठवले**
**98221 38317**

**पाककृती-केशरी साखर भात**

**साहित्य** : 1 वाटी जुना चांगला तांदूळ,दीड वाटी साखर, पाच लवंगा,दोन चमचे साजूक तूप, काजू,बेदाणे बदामाचे काप,केशर किंवा खाण्याचा केशरी रंग,2 वाट्या पाणी....

**कृती:** प्रथम तांदूळ एक तास आधी धुवून निथळून ठेवावेत. नंतर दोन चमचे साजूक तूपावर पाच लवंगा परतून त्यावर तांदूळ परतावेत.थोडे परतल्यावर त्यात दोन वाट्या गरम पाणी घालावे.नंतर झाकण ठेवून मोकळा भात शिजवून घ्याव्या.यानंतर दीड वाटी साखरेत साखर बुडेल एवढे पाणी घालून पक्का पाक करावा.पाक झाल्यावर त्यात केशर किंवा रंग घालावा.तसेच बेदाणे,बदामाचे काप, काजू घालावे. यानंतर पाकात मोकळा भात घालावा. पाक आणि भात एकत्र मिसळून घ्यावा. गॅसची ज्योत बारीक करून सर्व भात एकत्र शिजत ठेवावा व झाकण ठेवावे.भात शिजल्यावर गॅस बंद करावा.

**टीप:** गरज वाटल्यास पातेल्यातील तवा ठेवावा म्हणजे साखर भात खाली जळणार नाही.

..................................................



## आवाहन

**आपल्या सर्वांना आग्रहाची विनंति की संस्थेचे देणगीदार, हितचिंतक / वर्गणीदार व्हा.** त्यासाठी

वर्गणीदार/हितचिंतकास वार्षिक वर्गणी रु ५०० अथवा आजीव वर्गणीदार होण्यासाठी ची वर्गणी रु ७०००.

संस्थेच्या बॅंकेतील खात्याची माहिती HDFC Bank Ltd, F.C. Road branch, Pune, Current Account Number 50200056690683, IFSC Code HDFC0001115 ह्या खात्यात चेक/डीडी/रोख अथवा UPI / NEFT द्वारे पैसे भरून आपली माहिती गुगल अर्जाद्वारे पाठवावी. त्यासाठी लिंक खालीलप्रमाणे आहे
https://forms.gle/8xcrm1MkFY28XrsJ6
हा अर्ज आपल्याला सेलफोनवरून अथवा संगणकावरून भरता येईल.
सर्व आठवले परिवारांना विनम्र आवाहन करण्यात येते की आपण ठरविलेली उद्दिष्ट्ये आपल्या सर्वांच्या सक्रिय सहभागाशिवाय व आर्थिक पाठबळाशिवाय साध्य होऊ शकणार नाहीत म्हणून आपल्या आठवले परिवाराच्या सर्वांगीण उन्नतीसाठी मोठ्या संख्येने देणगीदार आणि वर्गणीदार / हितचिंतक व्हावे व संस्थेला आर्थिक पाठबळ द्यावे.



**श्रीरंग आठवले**